
कमला

# अजिंक्यपदाची अखंड परंपरा



प्राचार्यांसमवेत झोन अजिंक्यपद मिळविलेला सिनिअर बास्केटबॉल संघ



प्राचार्यांसमवेत जिल्हा अजिंक्यपद मिळविलेला ज्युनिअर बास्केटबॉल संघ

॥ निर्मातुं शिवं सुंदरम् ॥

# कमला

## ताराराणी विद्यापीठाच्या

## कमला महाविद्यालयाचे

# नियतकालिक

सातवा अंक

१९९१ - ९२

# कमला १९९१ - ९२

अध्यक्ष : प्राचार्य डॉ.क्रांतिकुमार रं. पाटील
प्रमुख संपादक : प्रा.सुमती साळुंखे

## विभागीय संपादक

मराठी विभाग : प्रा.सौ.एस.एल.देसाई
हिंदी विभाग : प्रा.सौ.एस.बी.पोवार
इंग्रजी विभाग : प्रा.सौ.एन.एस.धुमाळ

## विद्यार्थिनी प्रतिनिधी

कु.अर्चना मगदूम बी.कॉम.-१
कु.दिपा वासुदेवन १२ वी सायन्स

या अंकात प्रसिध्द (व्यक्त) झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# तुझे स्मरण स्फूर्तिप्रद, घडो आम्हा सदा



सम्राज्ञी ना, समर कुशला लोकनेत्री प्रतापी
सत्तांधाना नमवुनि रणीं आपुले राज्य स्थापी
नारी नोहे अमर जगतिं ज्योत ही पौरुषाची
ताराराणी जननि अमुच्या अस्मितेची, यशाची

-गदिमा

## कल्पवृक्ष कन्यांसाठी लावूनिया तुम्ही गेला



**कै.सौ. सरोजिनीदेवी तथा कमला विश्वनाथ पाटील**

(जन्म २८ - ४ - १९०९ मृत्यू १८ - ७ - १९६९)

## कर्तृत्वाचा महामेरु, ज्ञानार्थीशी आधारु



**मा.डॉ. व्ही. टी. पाटील**

संस्थापक अध्यक्ष - ताराराणी विद्यापीठ

## हाती काम ज्ञानाचे, मुखी नाम ज्ञानाचे




**प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील**

एम.ए., पी एच.डी.

# संपादकीय

'कमला ९२' हा अंक सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. महाविद्यालयाचे नियतकालिक प्रकाशित करणे ही आजकाल रूढी बनली आहे. परंतु आम्ही हा प्रयत्न डोळसपणे जाणीवपूर्वक करून काही शैक्षणिक उद्दिष्टे, ज्ञान व मनोरंजन हे हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करतो.

## ● 'कमला ९१' अंकास मिळालेली पारितोषिके :

★ शिवाजी विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेमध्ये कु.कल्पना कदम, बी.ए.भाग - २ हिने लिहिलेल्या 'सॉरी, रॉंग नंबर' या एकांकिकेस प्रथम पारितोषिक मिळाले.

★ कु.वंदना जाधव, बी.ए.भाग - ३ हिने घेतलेल्या ''घेई छंद मकरंद'' या छायाचित्रास तृतीय पारितोषिक मिळाले.

## ● कायम संलग्नीकरण

★ शिवाजी विद्यापीठाच्या शिफारशीवरून महाराष्ट्र शासनाने जून १९९० पासून महाविद्यालयाच्या कायम संलग्नीकरणास मान्यता दिली. ही गोष्ट १९८४ मध्ये स्थापन झालेल्या आमच्या महाविद्यालयाने अल्पावधीतच केलेल्या प्रगतीची निदर्शक तर आहेच त्याचबरोबर महाविद्यालयाच्या दृष्टीने गौरवास्पद व प्रशंसनीय आहे.

## ● यु.जी.सी. आर्थिक सहाय्यास पात्र

★ दुसरी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आमचे महाविद्यालय विद्यापीठ अनुदान मंडळाच्या १२ ब कलमामध्ये समाविष्ठ झाले असून आर्थिकसहाय्य मिळवण्यास पात्र ठरले आहे. आठव्या योजनेअंतर्गत ६ लाख रु. अनुदान मिळण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे प्रस्ताव पाठविला आहे. त्याचप्रमाणे 'क्रीडा विकासा' साठी ३ लाख रु. अनुदानाचा प्रस्ताव पाठविला आहे.

## ● शैक्षणिक गुणवत्तेमधील चढती कमान

★ महाविद्यालयाची विद्यार्थिनी संख्या चौदाशेच्या पुढे गेली आहे. ह्या संख्येबरोबरच गुणवत्तेमध्येही वाढ झालेली आहे; हे खालील निकालांवरून स्पष्ट दिसते

| | |
|---|---|
| १२ वी कला - ७२% | १२ वी वाणिज्य - ९३.००% |
| प्रथम वर्ष कला - ९७.९५% | प्रथम वर्ष वाणिज्य - ८१.६३% |
| द्वितीय वर्ष कला - ९५.४५% | द्वितीय वर्ष वाणिज्य - ९७.६७% |
| तृतीय वर्ष कला - ७३.५१% | तृतीय वर्ष वाणिज्य - ६८.७५% |

## ● विद्यापीठ परीक्षेमध्ये सर्वप्रथम

तृतीय वर्ष कला शाखेमधील हिन्दी विभागाची विद्यार्थिनी कु.लतिफा नांदणीवाले ही हिन्दी विषयात विद्यापीठात सर्वप्रथम आली. महाविद्यालयाच्या दृष्टीने ही अभिमानाची तसेच इतर विद्यार्थिनींच्या दृष्टीने स्फूर्तिदायक गोष्ट आहे.

● **क्रीडानैपुण्य**

टेबलटेनिसपटु कु.गायत्री भागवत हिची निवड मिझोराम येथे घेतलेल्या राष्ट्रीय टेबलटेनिस स्पर्धेकरिता झाली होती. तसेच तिची निवड दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय टेबलटेनिस कॅम्पकरिता झाली ही महाविद्यालयाच्या दृष्टीने भूषणास्पद गोष्ट आहे.

● **विद्यापीठ परीक्षेतील यश :**

बी.ए.भाग - ३ मधील वेगवेगळ्या विषयाच्या खालील विद्यार्थिनींनी प्रथमश्रेणी मिळवली त्यांचे अभिनदंन!

हिन्दी विभाग - कु.लतिफा नांदणीवाले
समाजशास्त्र विभाग - कु.वदंना तावडे
अर्थशास्त्र विभाग - कु.अनिता शिंदे
गृहशास्त्र विभाग - कु.उज्ज्वला नाईक

बी.कॉम.भाग - ३ मधील कु.मंजुळाबेन पटेल व कु.नम्रता सारडा या विद्यार्थिनींनी प्रथमश्रेणी मिळविली.

● **१२ वी विज्ञान**

मागील वर्षीच ११ वी विज्ञानशाखा सुरु केली गेली असून उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. ह्या वर्षी १२ वी विज्ञान वर्गाची पहिली तुकडी परीक्षा देईल. त्याचबरोबर पहिल्याच वर्षी १२ वी विज्ञान वर्गाला शासनाचे अनुदान मिळाले आहे.

● **भावी योजना – एम.ए. गृहशास्त्र (Home Science)**

गृहशास्त्र हा विषय पद्व्युत्तर पातळीवर शिवाजी विद्यापीठांतर्गत कोठेही शिकवला जात नाही. हा विषय अतिशय उपयुक्त असल्याने पद्व्युत्तर पातळीवर शिकविण्याची परवानगी आमच्या महाविद्यालयांला मिळावी म्हणून आमचे प्राचार्य प्रयत्नशील आहेत.

● **निरंतर शिक्षण**

या कार्यक्रमांतर्गत **बेकरी व कन्फेक्शनरी, ज्युदो व कराटेचे** प्रशिक्षण वर्ग घेतले गेले. त्याचबरोबर या वर्षी **ड्रेस डिझायनींगचा** तीन महिन्याचा कोर्सही सुरु केला असून त्याला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. सदरचे अभ्यासक्रम हे गरजू स्त्रियांच्या मार्गदर्शनासाठी उपयुक्त असून त्याना हे व्यवसाय स्वतंत्रपणे सुरू करता येण्याइतपत तयारी या अभ्यासवर्गातून होते.

● **आभार**

'कमला' हे नियतकालिक उत्कृष्ट व्हावे यासाठी प्राचार्य डॉ.क्रांतिकुमार पाटील यांनी वेळोवेळी बहुमोल सूचना व मार्गदर्शन केले. विभागीय संपादक प्रा.सौ.एस.एल.देसाई (मराठी), प्रा.सौ.सुमित्रा पोवार (हिंदी) व प्रा.सौ.एन.एस.धुमाळ (इंग्रजी) यांचेही सहाय्य झाले. प्रा.श्री.जे.बी.शिंदे यांनी अंक बिनचूक व्हावा यासाठी खुप मदत केली. त्याचबरोबर श्री.अजय दळवी यानी मुखपृष्ठ व आतील सजावटीची रेखाचित्रे करण्यासाठी बहुमोल सहकार्य केले. तसेच राजहंस प्रेसचे श्री.श्री.सी.गोसावी, अशोक कुलकर्णी व त्यांचे सर्व सहकारी यांनी अंक छपाईचे काम तत्परतेने व चांगले केले. या सर्वांचे शाब्दिक आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहाणेच आम्हास अधिक चांगले वाटते. शेवटी ज्ञानेश्वरांच्या शब्दात विनंती -

**परि न्यून ते पुरते। अधिकही सरते।**
**करून घेयावे हे तुमते। विनविले मिया॥**

**प्रमुख संपादिका**
प्रा.सुमती रा. साळुंखे



कु. व्हटकर
बी.ए. भाग ३

# मराठी विभाग

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १) बालगुन्हेगारी | कु.हेमलता निंबाळकर | १ |
| २) शिक्षणाला लागलेली कीड - ट्युशन | कु.अपर्णा पाध्ये | ४ |
| ३) माझा ऑल इंडिया ट्रेकिंग कॅम्प (उटी) | कु.अल्का रायमाने | ६ |
| ४) ''नव - महाराष्ट्र सहकारी सूत गिरणीस'' समाजशास्त्र विभागाची भेट | कु.पूनम देशमुख | ९ |
| ५) म.फुले यांचे स्त्रीविषयक विचार | कु.विद्या जाधव | १२ |
| ६) माझे आवडते नाटक - 'तुझे आहे तुजपाशी' | कु.प्रतिभा लंबे | १५ |
| ७) चित्तरकथा | कु.उन्मना पाटील | १७ |
| ८) लोकगीतातील स्त्रियांचा भावनाविष्कार | कु.ललिता पाटील | १९ |
| ९) कर्मयोगी कर्मवीर | कु.वैशाली पाटील | २२ |
| १०) जिद्द | कु.कमल तोडकर | २५ |
| ११) काळ | कु.अर्चना रायनाडे | २७ |


## पद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १) मंत्र | कु. उज्ज्वला जाधव | ३० |
| २) श्रध्देत शक्ती मोठी | कु.वैशाली सूर्यवंशी | ३० |
| ३) याचना | कु.धनश्री पाटील | ३० |
| ४) शिक्षकाची थोरवी | कु.वासंती यादव | ३० |
| ५) विरोधाभास | कु.संगीता मांडेकर | ३१ |
| ६) ही कोण ? | कु.पद्मश्री मगदूम | ३१ |
| ७) घरटे झाले पोरके | कु.रंजना पोवार | ३१ |
| ८) जीवन | कु.दमयंती कुलकर्णी | ३१ |
| ९) एका बेसावध क्षणी | कु.जास्वंदी कोळी | ३२ |
| १०) धुकेच संपले | कु.नीलम शिंदे | ३२ |
| ११) कशासाठी ? | कु.रुक्साना पठाण | ३२ |
| १२) प्रश्न | कु.संजीवनी माने | ३२ |
| १३) मृगजळ | कु.मनिषा तिवारी | ३२ |



# बालगुन्हेगारी

## समाज व राष्ट्रासमोरील एक आव्हान

कु.हेमनंदा आबासाहेब निंबाळकर
११वी आर्टस् (ब)

गुन्हा आणि गुन्हेगार ही अनादिकालापासूनच असलेली जगासमोरची एक महान समस्या आहे. यामध्ये बालगुन्हेगारांची भर पडत चालली आहे. औद्योगीकरण, नागरीकरण, लोकसंख्येत वाढ, निवासी जागेचा प्रश्न, भिन्न - भिन्न संस्कृती या व अशाप्रकारच्या अनेक गोष्टींचा बालकांच्या मनावर झालेला परिणामाचा एक भाग म्हणजे बालगुन्हेगारी होय. विशेषत: खेड्यातून आलेली, झोपडपट्टीत राहणारी शहरात स्वत:ला विसरलेली मुलं समाजाशी एकरुप होऊ शकत नाहीत आणि नकळत माहीत नसलेल्या पण चुकीच्या गोष्टींकडे आकर्षित होतात. याच गोष्टीला गुन्हा असे म्हटले जाते. म्हणून बालगुन्हेगाराची व्याख्या करताना 'फ्रेंड लॅडर' म्हणतात. ''कायद्यांच्या आधारे कारवाई करण्यास पात्र असे दुर्वर्तन करणारी मुलें ही बालगुन्हेगार होत''. किंवा बर्ट यांच्या मतानुसार ''जेंव्हा बालकाची समाजविरोधी प्रवृत्ती इतकी गंभीर स्वरुप धारण करते की ज्यामुळे ते बालक कायदेशीर कारवाईचे लक्ष्य ठरते, ठरण्याची शक्यता असते. तेंव्हा त्या बालकाना बालगुन्हेगार असे म्हणतात''. अशाप्रकारे वेगवेगळ्या अपराध-विज्ञान शास्त्रज्ञांनी बालगुन्हेगारीच्या व्याख्या केल्या आहेत. तरीपण थोडक्यांत समाजमान्य असलेल्या वर्तन प्रकाराच्या विरोधी असणारे आणि म्हणूनच विकृत वाटणारे बालकाचे वर्तन म्हणजे गुन्हेगारी असे म्हणावयास हरकत नाही आणि ही बालकें म्हणजेच बालगुन्हेगार होत.

प्रत्यक्ष या गोष्टींची सत्यता पडताळत असताना असे आढळून आले की १९६९ साली बालगुन्हेगारांनी ३२१ तर १९७४ साली ८०४ खून केले होते. तसेच १९६९ साली बालगुन्हेगारांनी ३४१२ तर १९७४ साली ७२३८ घरफोड्या केल्या होत्या. तसेच १९६९ साली ९४४५ तर १९७४ साली १६,१५३ किरकोळ चोऱ्या बालगुन्हेगारांनी केल्या होत्या. यावरुन असे स्पष्ट होते. की गुन्ह्यांचा कोणताही प्रकार असला तरी बालगुन्हेगारांची संख्या वाढतच चालली आहे. कायद्यांचे आणि सामाजिक रूढींचे उल्लंघन करण्याची प्रवृत्ती मुलांमध्ये वाढती आहे. यात लहान मुलांचा अपरिपक्व मेंदू व वेगवेगळ्या गोष्टींचा त्यावर झालेला परिणाम कारणीभूत असावा असे शास्त्रज्ञांचे मत आहे. बालगुन्हेगार निर्माण होण्याची जी अनेक कारणे आहेत त्यामध्ये उनाडपणा व भटकेपणा ही दोन महत्त्वाची कारणे आहेत, असे अपराध-विज्ञान शास्त्रज्ञांना वाटते. आपण वेगवेगळ्या अपराध-विज्ञान शास्त्रज्ञांचे उनाडपणाबद्दलचे विचार पाहू.:

समाजातील शिक्षणप्रसार सामान्य मुलांच्या प्रवृत्तींना प्राधान्य देतीलच असे नाही. पालक मुलांपासून दूर जाणे, त्यांचे मुलांकडे लक्ष नसणे किंवा त्याची मुलांच्या भवितव्याचा विचार करण्याची पात्रता नसणे व तशी गरजही नसणे हे एक कारण असू शकते. शाळेतील व शाळेबाहेरील परिसरांतील घटना त्यांच्या मनांवर परिणाम करीत असतात. उदा: वर्गातील वाईट वळणाची व्यसनी व दादागिरी करणारी मुलेच शेवटी शिक्षक व अधिकारी यांच्याकडून आपली कामे करून घेऊ शकतात. शाळेबाहेरील गल्लीत, चौकात असमंजसपणे, चित्रविचित्र कपडे घालणारी व चाळे करणारी मुलेच स्त्रियां व सभ्य समाजाला भीती दाखवू शकतात. हे पाहून इतर मुलेही बालगुन्हेगारीकडे आकर्षिली जातात. शाळा, शाळेतील शिस्त, अभ्यासक्रम आणि शिकविण्याच्या पध्दतीतील नावडणाऱ्या गोष्टी यामुळे अपरिपक्व मेंदू असलेल्या मुलांच्या उनाडक्या अधिकाधिक वाढतात. इलियट आणि मेरिल यांच्यामते वरील वातावरणातील शैक्षणिक शाळा या बालगुन्हेगारीच्या प्राथमिक शाळाच ठरू पाहतात. लखनी येथे १९५१ साली श्री.राजनाथ खन्ना यांनी ११ ते १५ वयोगटातील

शाळेतील मुलांची जी पाहणी केली त्यामध्ये शालेय शिक्षणातील पध्दतशीर नसलेल्या शिक्षणक्रम-घरांतील अयोग्य वातावरण, जेष्ठ मित्रांचा सहवास व नको त्या खेळाबद्दलचे जबरदस्त आकर्षण, तसेच घरातील जबाबदाऱ्या स्वीकारण्याची इच्छा नसते इत्यादी कारणामुळे मुलांमध्ये जुगार, भटकेगिरी आदि गोष्टी नियमीतपणे वाढत असलेल्या दिसतात. सर्वच मुले उनाड असतात असे नाही. पण जी मुले उनाड असतात ती आपले सुख व समाधान मिळविण्यासाठी काहीही करतात अशी समविचारी मुले एकत्र आली की त्यांचे गट तयार होतात आणि त्याबरोबरच जुगार, सट्टेबाजी, मद्यपान करणे इत्यादि गोष्टींना सुरुवात होते.

भटकेपणा हा पण गुन्हेगारीला कारणीभूत ठरतो. ज्या मुलांचे हित-संबंध त्यांच्या आई-वडिलांकडून, संस्थाकडून अथवा शासनाकडून संरक्षिले जात नाही. ती मुले गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात. मुले ज्या कुटुंबात असतात त्या कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रेम आपुलकी नसेल किंवा ते कुटुंब दरिद्री अथवा विस्कटलेल्या स्वरुपाचे असेल तर अशा कुटुंबातील बहुतांशी मुले या प्रवृत्तीकडे वळतात असे दिसून आले आहे. ज्या मुलांना पुरेसे कपडे मिळत नाहीत, शिक्षण मिळत नाही, तसेच प्रेमाची ऊब मिळत नाही. अशा मुलांची प्रवृत्ती, वरील गोष्टी मिळवण्यासाठी भटकी होण्याची शक्यता वाढते.

सदर लँडच्या मते दाट वस्तीच्या शहरांमध्ये गुन्हेगारीचे जेवढे प्रमाण असते तेवढे त्या शहरांपासून जितके दूर जावे तितक्या प्रमाणात ते कमी होतात.

श्रीमंत घरातील मुलांजवळ भरपूर पैसे असल्यामुळे त्यांच्याकडे सर्वच गोष्टी असतात. त्यामुळे त्यांचीही गुन्हेगारीकडे वाटचाल होत असते. अशाप्रकारे श्रीमंत व गरीब बालगुन्हेगार समाजात असतात.

शहरामध्ये लोकसंख्येचे प्रमाण खूप झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे लोकसंख्या ही एक गंभीर समस्या होऊन बसली आहे. त्यामुळे गुन्हेगारीला सुरुवात होते असे काही विचारवंतांनी मत व्यक्त केले आहे. आपण वस्तू चोरली तर आपल्याला कोणी रागावणार नाही या कल्पनेने मुले चोऱ्या करतात. चोऱ्या खपताहेत म्हटले की त्यांच्यात चोऱ्यांचे प्रमाण खूपच वाढते व ती मुलं गुन्हेगार होतात. एल्भर यांच्यामते शहरातील झोपडपट्टीसारखे विभाग बालगुन्हेगारीला अधिक सहाय्यभूत ठरतात.

ज्या कुटुंबामध्ये भांडणे होत असतात किंवा कुटुंबातील सदस्यांमध्ये परस्परांविषयी प्रेम,वात्सल्य,सहानुभूती, सह-संवेदना या भावना नसतील त्या घरातील लहान बालकावर याचा परिणाम होतो. या सतत घडणाऱ्या गोष्टींचा परिणाम या बालकांवर पडतो त्यामुळे अशी मुले संस्कारहीन होतात. व समाजघातक कृते करु लागतात. कुटुंबातील माता-पिता हे दोन घटक त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असतात. या दोघांपैकी एक व्यक्ती मृत्यू पावली अथवा दोनही व्यक्ती मृत्यू पावल्या तर याचाही परिणाम बालकांच्या मनावर पडतो. एखाद्या माता-पित्यांनी घटस्फोट घेतला असेल किंवा ती स्वतंत्र राहत असतील तर याचाही प्रभाव त्यांच्या बालकांवर पडतो. अशा मुलांना माता-पित्यांचे प्रेम, भावनिक सुरक्षितता मिळू शकत नाही. साहजिकच अशी मुले समाज घातक कृत्यांकडे वळू लागतात. ज्या मुलांची परिस्थिती गरीब हालाखीची असते. अशा मुलांना अधिक सुविधाजनक वस्तू हव्या असतात. त्या वस्तू मिळविण्यासाठी ही मुले समाजविरोधी मार्गावरुन चालू लागतात. व शेवटी गुन्हेगार ठरतात.

लहान बालके ही आपल्या समवयस्क मित्रांबरोबरच मनमोकळेपणाने वागत असतात. व आपली गुपिते एकमेकांना सांगत असतात. जर एखाद्या बालकाचे मित्र कुमार्गी असतील, सिगारेट ओढत असतील किंवा मद्यपान करीत असतील तर अशा मित्रांच्या सहवासात ही बालके सुध्दा सिगारेट ओढणे मद्यपान करणे या सारख्या मादक द्रव्यांचे सेवन करु लागतात. अशा मुलांच्या संगतीत आलेली बालके अनेक प्रसंगी स्वत:च्या इच्छेविरुध्द गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात.

दुर्बल मन आणि असामान्यता हे दोनही घटक गुन्हेगारीची कारणे म्हणून मान्य करण्यात आलेली आहेत. गोरिंग या शास्त्रज्ञांच्या मते दुर्बल मनाची बालके अधिक प्रमाणात गुन्हेगार असतात किंवा गुन्ह्यांची निर्मिती दुर्बल मनाच्या बालकांकडून अधिक प्रमाणात होते. सर्वसाधारण विद्यार्थ्यांपेक्षा कमी बुध्दीच्या विद्यार्थ्यांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण अधिक असते असे

मत गोडार्ड या शास्त्रज्ञाने प्रयोगाद्वारे सिध्द केले आहे.

अलिकडील काळात सिनेमा, टी.व्ही. या सारख्या करमणूक साधनांचा प्रभाव बालकांच्या मनावर फार मोठ्या प्रमाणावर पडलेला दिसतो. सिनेमा मधील नट-नट्या व त्यातील प्रसंग त्यांना आकर्षित करतात आणि त्यांचे अनुकरण करण्याचा ते प्रयत्न करतात. विशेषत: अनीतीकारक आणि लैंगिक भावनांना उत्तेजित करणारी चित्रणे त्यांना आवडतात आणि त्यांचे अनुकरण दैनंदिन जीवनात करण्याचा प्रयत्न करतात. यातून समाजमान्य नसलेले वर्तन त्यांच्यातून घडते.

तसेच अनैतिक संबंधातून निर्माण झालेल्या बालकांना घराचे घरपण मिळालेले नसते. ना प्रेम, ना आस्था, ना आसरा अशी ही मुले साहजिकपणेच गुन्हेगारीकडे वळतात. जी मुले सुधारणालयात, अभिक्षणगृहात वा तुरुंगात गेलेली असतात, तिथे ती सुधारणालयातील इतर बालगुन्हेगारांकडून अनेक गुन्ह्यांची तंत्रे आत्मसात करतात. जेव्हा ती मुलं समाजात येतात तेव्हा ती प्रगत गुन्हेगार झालेली असतात. अशी अनेक कारणे या बालगुन्हेगारीच्या पाठीमागे असतात.

बालगुन्हेगारांच्या जगतात मुलांच्या बरोबर मुलींचांही सहभाग विचार करण्याएवढा आहे. १९६९ च्या आकडेवारीनुसार ४७०० मुली बालगुन्हेगार होत्या आणि ही संख्या १९७४ साली ८५०० झालेली आढळली मुलांच्या बाबतीत ही संख्या १९६९ साली ७४०० होती तर १९७४ साली १,३२,००० होती. म्हणजेच बालगुन्हेगारात मुलींची संख्या जरी कमी असली तरी दुर्लक्ष करण्यासारखी नाही.

बालगुन्हेगारीची समस्या प्रत्येक राष्ट्रांप्रमाणे भारतामध्येही सातत्याने वाढती आहे असे दिसते. भारताचे भवितव्य, सुजाण, कर्तबगार, शिस्तप्रिय, कर्तृत्वशाली आणि जागरुक नागरिकांच्या हाती असेल तर त्यासारखे सुदैव नाही

★★★★

**संगिता मांडेकर** / ११वी कॉमर्स

## नाटकीय पत्र

श्रीयुत डॉ. लागू यांना,

घाशीराम कोतवालचा साष्टांग नमस्कार

*वि.वि. आपले पत्र मिळाले, 'बायको माहेरी पळाली' हे वाचून वाटते की 'बायकोपेक्षा मेव्हणी बरी' हेच खरे, म्हणजे मी 'सडा फटिंग' आहे तोच बरा.*

*विशेषत: म्हणजे 'भाऊबंदकी' सोडून 'वेगळं व्हायचं मला' असा निर्णय घेतला आहे. आणि हा परवाच आपला 'सखाराम बाईंडर' भेटला म्हणाला,'कवडी चुंबक झालोय' 'संभुशाच्या चाळीत' पाय ठेवणार नाही. त्यापेक्षा 'हमिदाबाईची कोठी' बरी आणि त्याची ती 'सखी शेजारणी' अहो ती 'लफडा सदन' मधील, तिच्याशी 'प्रेमसंन्यास' घेऊन 'दिल्या घरी तु सुखी रहा' असं तिला म्हणाला सुध्दा. 'लग्नाची बेडी' पसंत नसावी त्याला.*

*आणि तुमचं काय? 'उभा मी अंधारी' म्हणून कसं चालेल? 'बायको उडाली भुर्र' म्हणून काय झालं. तिला तुम्ही म्हणावं 'गाठ आहे माझ्याशी' नाहीतर आयुष्याचा 'सुर्यास्त' झालाच समजा. ती आल्यानंतर 'तो मी नव्हेच' म्हणून 'गोष्ट जन्मांतरीची' घडू देवू नका.*

*असो, आता मी 'राजकारण गेलं चुलीत' हा निर्णय घेऊन 'राजसंन्यास' घेतलाच आहे तेव्हा यात 'माझ काय चुकलं' नाही तर 'काका मला वाचवा' म्हणावं लागलं असतं. शेवटी 'एकच प्याला' सर्व काही घडवितो.*

*नंतर मी कळविनच, त्यावेळी लोकांना म्हणावं 'वऱ्हाड निघालय लंडनला' नाहीतर आल्यानंतर हट्ट धराल 'हनिमून' झाला पाहिजे.*

*आपला कृपाभिलाषी,*

***घाशीराम कोतवाल***

# शिक्षणाला लागलेली कीड - 'ट्युशन'



कु.अपर्णा अ. पाध्ये
बी.ए.भाग-३

आज-कालच्या युगात ट्युशनशिवाय शिक्षण अतिशय कमी दर्जाचे मानले जाते. ट्युशन जर नसेल तर विद्यार्थी परीक्षेत पासच होऊ शकत नाहीत, असा एक गैरसमज समाजात पसरला आहे. ट्युशन ही परीक्षेत पास होण्याची गुरुकिल्ली किंवा रामबाण उपाय मानला जातो. विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी १० वी किंवा १२ वी ला असेल तर ''कुठली ट्युशन लावली आहे?'' असा प्रश्न हमखास विचारला जातो

तसं पाहिले तर विद्यार्थ्यांना ट्युशनची गरजच नाही, कारण शिक्षणसंस्थांमधून शिक्षक आपली जबाबदारी व्यवस्थित रीतीने पार पाडत असतात. तरीही विद्यार्थ्यांची अशी ओरड असते की, आम्हाला शिक्षकांचे समजत नाही. पण जर समजत नसेल तर उठून विचारण्याचे धाडस केले जात नाही, प्रश्न अनुत्तरित राहतात, विचारांचा गोंधळ माजतो आणि त्यामुळे अभ्यास होत नाही. मग आलेल्या अपयशाचे खापर मात्र शिक्षकांच्या डोक्यावर फोडले जाते.

ट्यूशनला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पाहिले की; त्यांची दया येते. सकाळी ट्युशन, मग शाळा किंवा कॉलेज, पुन्हा संध्याकाळी ट्युशन, मग ट्युशनचा होमवर्क, शाळेचा अभ्यास... या वर्षभराच्या चाकोरीबध्द जीवनाचा विद्यार्थ्यांना कंटाळा येतो. या अशा हलाखीच्या अवस्थेमुळे त्यांची शारीरिक व त्यांच्या रात्रंदिवसाच्या अभ्यासाच्या तणावामुळे त्यांची मानसिक हानी झाल्यामुळे अभ्यासावर परिणाम होतो. घरी टोचणी सुरु होते,''ट्युशनला जाऊन सुध्दा असे!'' आई-वडील म्हणू लागतात,''तुझ्या ट्युशनसाठी एवढा खर्च केला आणि तू मात्र.....!''

काही पालक ही ट्युशन केवळ नाईलाज म्हणून स्वीकारतात. समाजामध्ये आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठी ट्युशनची भरमसाठ फी देत असतात. कारण जर आपण आपल्या पाल्याला ट्युशनला नाही घातले तर ''लोक काय म्हणतील?'' हा प्रश्न त्यांना भेडसावतो. पण आपल्या मुलांच्या आरोग्याकडे, त्याच्या मानसिक परिस्थितीकडे दुर्लक्ष होत आहे. याचा विचार केला जात नाही. उच्चवर्गातील या ट्युशनच्या फॅशनमुळे मध्यमवर्गीय मात्र कारण नसताना आपली आर्थिक व विद्यार्थ्याची शारीरिक आणि मानसिक हानी करून घेतात.

कॉलेजमध्ये तर काही उच्चवर्गीय ट्युशनला जाणारे विद्यार्थी तास चुकवणे, कॉलेजला दांडी मारणे ही एक फॅशन समजतात. इकडे-तिकडे विनाकारण घुटमळत राहातात. आणि आपल्याबरोबर इतर विद्यार्थ्यांचे नुकसान करतात. या फॅशनला बळी पडलेले असे विद्यार्थी जे ट्युशनला जात नाहीत त्यांची परिस्थिती वाईट बनते. त्यांना कमी गुण मिळतात आणि ते उच्चवर्गीय नसल्यामुळे, घरबसल्या उदरनिर्वाह शक्य नसल्याने, सुशिक्षित बेरोजगार बनतात.

ट्युशनमुळे अध्यापकांचा मान कमी होतो. कारण आपण ट्युशनला जात आहोत म्हणजे आपल्याला शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षणाची गरज नाही असा विचार काही विद्यार्थी करतात. त्यामुळे शिक्षकांबद्दलचा त्यांचा आदर कमी होत जातो. पूर्वी गुरुंना माता-पित्याप्रमाणे आदराचे स्थान होते. परंतु आजकाल ट्युशनने हा आदर कमी केला आहे.

शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षणाची आपल्याला गरज नाही असा विचार केल्यामुळे तास चुकवणे, शाळा-कॉलेजच्या आवारात हिंडणे असे प्रकार सुरु होतात. तास चुकवण्याची एकदा चटक लागली की, मग त्याची कारणे, खोट्या सबबी शोधून काढल्या जातात आणि त्यातून त्यांना वाईट संगत लागण्याची, व्यसने लागण्याची शक्यता निर्माण होते. विद्यार्थी वाहवत जातात आणि शारीरिक, मानसिक, बौध्दिक पतन घडून येते.

काही वेळेला विद्यार्थी आपल्या शिकवण्याकडे लक्षच देत नाहीत तर आपण तरी कशाला शिकवा? असा विचार काही शिक्षक करतात व त्यांचे दुर्लक्ष होते. परंतु सर्वच जण असा विचार करत नाहीत. कारण तसे जर केले तर इतर विद्यार्थी जे ट्युशनला जात नाहीत, त्यांचे नुकसान होईल.

काही शिक्षक स्वत:च शिक्षकी पेशा व्यतिरिक्त जोडधंदा म्हणून ट्युशन्स घेतात. त्यामुळे त्यांचे शारीरिक नुकसान होते. कारण ते सकाळपासून सायंकाळपर्यंत आपली नोकरी व ट्युशन असे करतात. तसेच दिवसभराच्या शिकवण्यामुळे त्यांचे मानसिक नुकसान देखील होऊ शकते. त्याचा त्यांच्या शिकवण्यावर परिणाम होऊन विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते. हाच विचार करून सरकारने ट्यूशनचा धंदा करण्यावर बंदी घातली आहे, पण याकडे लक्ष कोण देतो?

ट्युशनला जाणारे विद्यार्थी केवळ घोकंपट्टीवर भर देतात कारण त्यांना त्यांच्या अभ्यासाव्यतिरिक्त ट्युशनचा देखील अभ्यास करावा लागतो.

जे विद्यार्थी ट्युशनला जातात असे विद्यार्थी वर्गात लक्ष देत नाहीत. टिवल्या-बावल्या करत राहातात. परंतु त्यांच्या अशा वागण्यामुळे त्यांचे स्वत:चे तर नुकसान होतेच पण इतरांचे देखील दुर्लक्ष होऊन नुकसान होते.

काही वेळेला आई-वडील मुलांवर ट्युशन लादतात. जर आपल्या मुलांना मार्क्स चांगले नाही मिळाले तर ''लोक काय म्हणतील?'' असा विचार ते करतात. परंतु विद्यार्थ्याच्या इच्छेकडे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे भारंभार ओतलेला ट्युशनचा पैसा फुकट जातो आणि केवळ निराशा पदरी येते.

काही वेळेला शाळा किंवा कॉलेजमधील अध्यापक एक पाठ शिकवतात व त्यानंतर ट्युशनमधील शिक्षक तोच पाठ शिकवतात. परंतु त्या दोन्हीं शिक्षकांच्या शिकवण्याच्या पध्दतीत फरक असल्यामुळे विद्यार्थ्यांचा गोंधळ उडतो त्यामुळे त्यांचे लक्ष विचलीत होते. आपल्या शिक्षकांनी शिकवलेले बरोबर की ट्युशनच्या शिक्षकांनी? हा प्रश्न त्यांच्या मनात घोळत रहातो आणि विचारांच्या फरकातून गोंधळ निर्माण होतो.

ट्यूशन घेणारे भल्या-मोठ्या जाहिरातींनी विद्यार्थ्यांवर भुरळ पाडतात. अशा जाहिरातींकडे कमकुवत विद्यार्थी आकर्षित होतात, याची त्यांना खात्री असते. म्हणून ते विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून त्यांची फसवणूक करतात.

सकाळपासून सायंकाळपर्यंतच्या ठराविक कार्यक्रमाच्या चाकोरीबध्द जीवनामुळे विद्यार्थ्यांना इतर गोष्टींकडे उदा. खेळ, वाचन, छंद इ. कडे त्यांचे दुर्लक्ष होते. त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळत नाही.

अशा प्रकारच्या निराशेतून काही वेळेला विद्यार्थ्यांचे मानसिक संतुलन बिघडण्याचा धोका निर्माण होतो. भरमसाठ फी भरून पालक विद्यार्थ्याला ट्युशनला पाठवत असल्याने एक प्रकारचे दडपण विद्यार्थ्याच्या मनावर असते आणि त्याचबरोबर मानसिक नैराश्य यांच्या मिलापातून विद्यार्थी भरकटण्याची शक्यता निर्माण होते. काही वेळेला अपेक्षेपेक्षा कमी मार्क पडल्याने विद्यार्थी खोटे सुध्दा बोलू लागतात आणि मानसिक तोल जास्त बिघडत जातो. अशाच वेळी जर एखादी कुसंगत लागली तर विनाशाला पारावारच नाही! हे सर्व 'ट्युशनचक्रामुळे' होते. तेंव्हा हे दुष्टचक्र थांबवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला नकोत काय?

शिक्षणाला लागलेल्या या किडीने शिक्षणाचा वटवृक्ष पोखरण्यास सुरुवात केली आहे. त्याचा संपूर्णपणे नाश होण्यापूर्वी तिचा समूळ नाश करण्यासाठी आपणच पाऊले उचलायला नकोत काय?.

★★★★

oooooooooooooooooooooooooo

# माझा ऑल इंडिया ट्रेकिंग कॅम्प (उटी)

(प्रवास वर्णन)

अलका रायमाने

बी.कॉम.भाग-२

खूप खूप विनवणी करून, आपल्या लाडक्या मुलीला २१ दिवस डोंगर-दऱ्यातून, चहाच्या मळ्यातून प्रवास कराव्या लागणाऱ्या कॅम्पला पाठवायला माझ्या घरचे लोक तयार झाले.

अखेर तो रंगीबेरंगी स्वप्नांचा दिवस उजाडला. ४ मे १९९१ चा दिवस होता. कॅम्पला फक्त १४ मुली आणि एक आमच्या बटालियनचे इनस्ट्रक्टर हवालदार चौगुले, एवढेचजण होतो. प्रत्येकाच्या ३-३ बॅगा होत्या. एक खाऊची छोटीशी बॅग हातात. एक बटालियनने दिलेली किटबॅग. त्यात सगळ्या बटालियनच्याच वस्तूंचा समावेश होता. जंगलात वापरण्यासाठी जंगल शूज, वॉटरबॅग, कंबळ, ग्राउंडशिट (दरी आणि ट्रेकिंगच्यावेळी पाठीला लावायची लहानशी बॅग).

बॉबे - बेंगलोर अशा रेल्वेप्रवासानंतर आम्ही उटीला पोहोचलो. ९ वाजताच्या ट्रेननी आम्ही आमच्या कॅम्पच्या स्पॉटला पोहोचलो. आमच्या अगोदर कितीतरी राज्यातल्या कॅडेटस् तिथे उतरल्या होत्या. आम्हाला ८ नं. रुम मिळाली. हात धुवून लगेच नाष्ट्याला बोलावले. लगेच आम्हाला रिपोर्टसाठी पुन्हा बोलावले गेले. तिथे कॅम्पकमांडर लेफ्ट. कर्नल नेहरी यांच्याबरोबर आमचा ग्रुपफोटो घेतला गेला.

खरा ट्रेकिंगचा दिवस उजाडला तो ८ मे ला त्यादिवशी सकाळी कॅम्पकमांडरनी आमच्या पहिल्या दिवसाच्या ट्रेकिंगला शुभेच्छा दिल्या व नकळत ते म्हणाले,''मौसम है रंगीन, सफर है सुहाना, मेरे हमसफर कही खो न जाना॥'' जंगलातून जाताना आपल्या मैत्रिणींना सोडून कुठे जाऊ नका व या आनंददायक प्रवासात स्वत:च्या मनाला हरवून घ्या पण स्वत: हरवू नका, हाच त्यांच्या सांगण्याचा उद्देश होता.

८ तारखेच्या ट्रेकिंगला सुरुवात झाली. कर्नल नेहरी झेंडा घेऊन आम्हाला निरोप द्यायला थांबले. आमची पावले उत्साहाने पुढे पडू लागली. पहिल्यांदा डांबरी रोड होता त्यामुळे जास्त मजा आली नाही पण ज्यावेळी जंगलातील पाय-वाट सुरू झाली त्यावेळी मात्र आमचा आनंद गगनात मावेनासा झाला. जंगलातील ती काट्याकुट्यांची झाडे, काटेरी फुले, वर-वर चढण्याचा रस्ता मध्येच एखादा पाण्याचा ओहोळ ओलांडून जंगलातून शिट्ट्या मारत, आ-ऊ करून ओरडत आम्ही पुढे जाऊ लागलो.

आम्ही मेटूपलमहून मरप्पलमला आलो. तिथला परिसर पाहून चालण्याचा थकवा कुठल्या कुठे पळाला. पूर्ण जंगलात एकच मोठा बंगला. त्या बंगल्याला 'ट्रॅव्हलर्स बंगलो' असे म्हणत उंच भिंतीचा कट्टा. त्या कट्ट्याच्या आतल्या बाजूला रुम होत्या. त्या बंगल्याच्या बाजूलाच वरुन पडणाऱ्या पाण्याचा झरा. बंगल्याच्या गॅलरीतून चहूकडचे दाट जंगल. मध्येच खोल दरी आणि त्या दरीसमोर दूरवर दिसणाऱ्या धूसर अशा चार-पाच डोंगरांच्या रांगा. तिथेच सूर्यास्त होणार होता. व तो आपल्याला पहायला मिळणार म्हणून आम्ही एकदम खूष होतो. झऱ्याच्या गार पाण्यानी आंघोळी आटोपल्या. दुपारची जेवणं आणि संध्याकाळचा चहा झाला. आम्ही फ्रेश होऊन गॅलरीत थांबलो. सूर्य थोड्याच वेळात मावळणार म्हणून मी त्याच्याकडेच पहात बसले होते. तिथले रम्य दृष्य पहाण्यात मी एकदम गुंग झाले होते. सूर्य त्या डोंगरांच्या रांगेकडे गेला होता. अनेक मुली फोटो काढत होत्या. मी मात्र ते दृष्य पापणी



न मिटता पहात होते. वाटत होतं क्षणभर जरी पापणी मिटली तरी हे दृष्य नाहीसं होईल म्हणून मी त्या दृष्याला मनात साठवत होते. आणि हृदयात त्याचा न पुसण्यासारखा फोटो काढून घेत होते.

९ तारीख उजाडली. आदल्या दिवसाचाच दिनक्रम होता. फक्त इथे आम्ही एका 'लिटल फ्लॉवर स्कूल' नावाच्या शाळेत उतरलो होतो. ही शाळा खिस्ती फादर चालवत होते. त्यांचा ऑर्केस्ट्रापण होता. त्यामुळे ते स्वत: प्रोग्रॅम देतच. पण त्यांच्या ऑर्केस्ट्रावर मलासुध्दा गायला मिळाले आणि त्या दिवसापासून सगळ्या कॅडेटमध्ये मी सिंगर म्हणून ओळखू लागले. या ठिकाणाचे नाव होते 'Selas'.या ठिकाणी संध्याकाळच्या जेवणासाठी महाराष्ट्राच्या मुलीनी चपात्या केल्या व चपातीमध्ये सर्वांनाच प्रसिध्दी मिळाली.

१० तारखेला आम्ही मेजर संतोषकुमार यांच्या देखरेखीखाली 'चामराज टी इस्टेट' ला आलो. संध्याकाळी नेहमीप्रमाणे गाणी, डान्स झाले. दुसऱ्या दिवशीपण तिथेच हॉल्ट होता. ११ तारखेला आम्हाला चहाच्या मळ्यातूनच चहाचा कारखाना दाखवायला नेले. चहा कसा तयार करतात हे पाहिल्यावर खूपच मजा आली. तिथे एक देऊळपण होते. देवळासमोर जांभळ्या रंगाच्या छोट्या-छोट्या फुलांचा एक वृक्ष होता. त्या वृक्षाखाली जांभळ्या फुलांचा सडा पडलेला होता। लांबून हे दृश्य खूपच मनमोहक वाटत होते.

१२ मे ला आम्ही चहाच्या गार्डन मधून उड्या मारत मारत यड्क्काड ला पोहोचलो. तिथे मेजर बसेरांच्या दखरेखीखाली आम्ही एका Govt. HR.SEC. School मध्ये थांबलो.

दररोजच्या प्रवासात एका मुलीला सामानाबरोबर गाडीतून यावे लागे व आज़ारी मुलींनासुध्दा गाडीतून नेले जाई. अशाप्रकारे प्रवास करत करत आम्ही नंजनाडचा प्रवासपण संपविला. तिथल्या प्रवासाचे विशेष म्हणजे (१३ मे च्या) महाराष्ट्रीयन मुलींची जेवण वाढण्याची सर्व्हिस. जेवण वाढण्याची सर्व्हिससुध्दा आम्ही उत्साहाने करताना पाहून तिथले केअर टेकर मेजर टंडन आमच्यावर बेहद्द खूष झाले. आणि त्यांनी तोंड भरून आमचं कौतुक केलं.

१४ मे ला आम्ही अशा एका ठिकाणी पोहोचलो ज्याची आम्हाला ओढ लागलेली होती. ते ठिकाण म्हणजे 'उटी', उटीमध्ये आम्ही 'सेंट जोसेफ हायर सेकंडरी स्कूल' मध्ये उतरलो होतो. तिथे अतिशय थंडी होती. सकाळीच आम्हाला दोन-दोन रग घेण्याचा इशारा केला. मी आणि गारगोटीची रोहिणी एकमेकीवर

दोन रग घेऊन एकत्रच झोपत होतो. त्यामुळे आम्हाला आणखी रग घेण्याची आवश्यकता भासली नाही. तो दिवस एका वेगळ्याच कामात गेला. दुसऱ्या दिवशी व्हिडीओ शुटिंग होणार होते. त्याची तयारी करून घेत होते. माझे गाणे आणि अपर्णाचा डान्स हे महाराष्ट्राचे दोन आयटेम्स् होते.

१५ तारखेला आम्हाला आऊट पास होता. उटीचे सुप्रसिद्ध बॉटॅनिकल गार्डन दाखवण्यासाठी आम्हाला नेण्यात आले. आमचा शेवटचा ड्रेस त्यादिवशी आम्ही घालण्यासाठी काढला. रोजची व्हाइट ड्रेसची रांग आज रंगीबेरंगी दिसू लागली. उटीमधील हे सुप्रसिद्ध गार्डन पाहून आम्ही धन्य-धन्य झालो. तिथली रंगीबेरंगी फुले, वेगवेगळ्या वेलींनी वेगवेगळी राज्ये दर्शवणारा भारताचा नकाशा, फुलझाडानी बनविलेलं छोटसं घरटं, (फुलझाडांची झोपडी) हे सर्व डोळ्यात साठवून, आम्ही मनात नसतानाही परत फिरलो. अनेक वस्तू खरेदी केल्या, मुख्य म्हणजे स्वेटर्स.

संध्याकाळी परवानगी नसतानासुध्दा आम्ही आग्रहाने बोटिंग करायला गेलो तिथे हॉर्स रायडिंग केले. अनेकवेळा पिक्चरमध्ये पाहिलेले सीन आज आम्ही प्रत्यक्ष पहात होतो. त्यामुळे काही वेगळाच आनंद आमच्या मनात होता. तिथल्या मशीनमध्ये तयार केलेला चहा घेऊन आम्ही व्हिडीओ शुटिंगसाठी माघारी वळलो. कार्यक्रम झाल्यावर चिपळूणच्या सबा ची मुलाखतपण व्हिडीओवर झाली. त्यामुळे तिचापण आनंद वाढलेलाच होता.

१६ तारखेला आम्ही उटीचा निरोप घेतला व दोडाबेट्टाकडे निघालो. हे ठिकाण सर्वात उंच होते. आणि इथे खूपच त्रास होणार होता. पण कालच्या उत्साहामुळे आम्ही हा प्रवास आनंदात करत होतो. वाटेत आम्हाला 'टेलिस्कोप हाऊस' पहायला मिळाले. तिथे नेहमीची यात्रा भरलेली असायची. आमची थोडीफार खरेदीपण झाली. टेलिस्कोप हाऊसमधून संपूर्ण आजूबाजूची गावं सरळ दिसत होती. उटीसुद्धा डौलदारपणे उभी असलेली खोलवर दिसत होती. तिथून आम्ही दोडाबेट्टाला पोहोचलो. तिथे एक दिवस राहून १७ तारखेला अरवनकाडला गेलो. तिथे आमचा शेवटचा दिवस उजाडला. आम्ही कुन्नुरला येणार होतो. वाटेत आम्हाला एक लष्करी कार्यालयाला भेट द्यायला मिळाले. तिथले अनेक वस्तूंचे कलेक्शन पाहून कौतुक वाटले. अनेक वीर पुरूषांचे फोटो तिथे होते. अनेक प्रकारच्या जहाजांची रेखाचित्रे शस्त्रास्त्रे, खूप काही पहाण्यासारखे होते.

शेवटी कुन्नूरला पोहोचलो. एक दिवस तिथे राहून आमचा सर्व अनुभव एकमेकांना सांगून, एकमेकांचे पत्ते घेण्यात तो दिवस गेला. १९ मे ला निरोपाचा दिवस उजाडला. आम्ही आमचे सामान परत आणले. योग्य रीतीने भरले. आणि १९ तारखेला ले.कर्नल नेहरींचा निरोप घेऊन आम्ही महाराष्ट्राकडे येण्याच्या वाटेला लागलो.

★★★★

## मी कोण ओळखा ?

*१ टोपी घालतो पण डोके नाही,*
*पोट आहे पण हृदय नाही,*
*स्मगलर आहे पण चोर नाही,*
*उड्या मारतो पण बेडूक नाही,*
*मी नसलेला असा देश नाही,*
*तर ओळखा पाहू – मी कोण ?*

*२ सिमेंट मला गोड लागते,*
*पोलाद माझे खाद्य आहे,*
*इंजिनियर्स माझ्या खिशात आहेत,*
*तर ओळखा पाहु – मी कोण ?*

*३ लुटमार करतो पण चोर नाही,*
*गोडाऊनमध्ये आहे पण बाजारात नाही,*
*रंग काळा आहे पण कावळा नाही,*
*सर्वांच्या माहितीचा आहे,*
*पण कोणी पकडू शकत नाही,*
*तर ओळखा पाहु – मी कोण ?*

*कु. वंदना विलास जाधव*
*१२ वी कला.*

उत्तर :
१) मंत्री
२) कॉंट्रॅक्टर
३) स्मगलर

# ''नव-महाराष्ट्र सहकारी सूत गिरणीस''

## समाजशास्त्र विभागाची भेट

कु.पूनम बाजीराव देशमुख
बी.ए.भाग-३

**प्रास्ताविक :**

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए.भाग-३ स्पेशल समाजशास्त्र या वर्गासाठी औद्योगिक समाजशास्त्र पेपर क्र. ५ हा समाविष्ठ करण्यात आला आहे. सविस्तर व प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी शुक्रवार दि. १३-१२-९१ रोजी एक अभ्यासगट म्हणून सहकारी तत्वावर उभारलेली सूतगिरणी व संपूर्ण भारतात व जगात प्रसिध्दीपथावर असलेल्या नवमहाराष्ट्र सहकारी सूतगिरणी लि. साजणी येथे आम्ही गेलो होतो.

**सूतगिरणीची स्थापना व परिसर :**

नवमहाराष्ट्र सहकारी सूतगिरणीचा पायाभरणी शुभारंभ इ.स.१९७९ ला मा. शरदरावजी पवार यांच्या हस्ते झाला. प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेला सुरुवात १९८६ ला झाली. गिरणीसाठी साजणी हाच परिसर निवडला. कारण ग्रामीण भागात सूतगिरणी काढल्यामुळे सरकार अनेक सवलती देते. तसेच खेड्यातील बेकार असलेल्या तरुणांना रोजगार मिळतो. साजणीच्या परिसरात एकही उद्योगधंदा नाही. या सूतगिरणीसाठी येथील परिसर योग्य आहे. या गिरणीच्या परिसराचे एकूण क्षेत्र ५५ एकर आहे. यापैकी ७ एकर जमिनीवर प्रत्यक्ष गिरणीचे कार्यक्षेत्र आहे. गिरणीत ॲटोमॅटिक यंत्रे असल्याने पाण्याचा वापर कमी प्रमाणात केला जातो. तरीही दररोज ३००० गॅलन पाणी लागते. ते उपलब्ध करण्यासाठी दोन मोठे बोअरवेल आहेत. तसेच पंचगंगा नदीचाही उपसा केला जातो.

गिरणीच्या भागभांडवलासाठी जनता बँक, एम.एस.एफ.सी., स्टेट बँक, शासकीय बँक, एन.सी.डी.सी., भारतीय औद्योगिक विमा निगम दिल्ली इ कडून सहकार्य लाभले. सध्या गिरणीतील सभासदसंख्या जवळ-जवळ साडे पाच हजारापर्यंत आहे. गिरणीचे एकूण भागभांडवल साडेसव्वीस कोटी रुपये आहे. या नवमहाराष्ट्र सहकारी सूतगिरणीचे संस्थापक मा. बिडकर आहेत. सध्याचे अध्यक्ष मा.बापूसाहेब मोरे आहेत. गिरणीतील मालक व कामगार यांचे संबंध चांगले आहेत. कामगारांसाठी प्रॉव्हीडंड फंड, बोनस इ. तसेच अद्यावत स्टाफ क्वार्टर्स या काही उच्च अधिकाऱ्यांसाठी आहेत. कामगारांना येथे सतत संतुष्ट, समाधानी व उत्साही ठेवण्याचा प्रयत्न केला जातो;.

**प्रक्रिया :**

नवमहाराष्ट्र सहकारी सूतगिरणीला कापसाचा पुरवठा गुजरातहून केला जातो. दररोज तीन पाळ्यांमध्ये ४० ते ५० गाठी आत टाकल्या जातात. तिथे एक ब्लोरुम मशीन आहे. ते ठेवलेल्या कापसाच्या गाठीवरुन फिरते व वरवरचा कापूस आत ओढून घेते. नंतर ते पुढच्या विभागाला पोहेचवते. नंतर हा कापूस पुढे पुढे सरकत जाऊन 'लोसाटॅक्स' या मशिनमध्ये येतो. हे मशिन अशुध्द कापूस बाहेर टाकते. यातून पुढील प्रकारचा अशुध्द कापूस निघतो व तो वेगवेगळ्या कारणांसाठी वापरला जातो.

१) **कोंबर** – एका पाळीत म्हणजे ८ तासांमध्ये ७ गाठी बाहेर पॅकिंग करून पडतात. ह्या शुध्द कापसाचा वापर कापड तयार करण्यासाठी इतर मिल्स् घेतात. मुंबई,बेंगलोर,पुणे,कर्नाटक या ठिकाणी हा कापूस पाठविला जातो.

२) **कार्डिंग** – याच्या रोज ३ गाठी बाहेर पडतात. हा कापूस गादी करण्यासाठी वापरण्यात येतो.

३) **हार्डवेस्ट** – हा तीन नंबरचा कापूस होय. हा इतर



मिलमध्ये घेतात. ८ तासांमध्ये १४ गाठी लोसाटॅक्स हे मशिन बाहेर टाकते.

४) **फॅन वेस्ट –** हा कापूस गाद्या व तक्के तयार करण्यासाठी वापरला जातो. हा कापूस इतर मिल्स् घेतात.

नंतर येथून शुध्द कापूस कार्डिंग मशिन मध्ये येतो. इथे कापसाचे शुध्दिकरण होत जाऊन बारीक वात तयार होत जाते. येथून कापूस पुढे-पुढे सरकत 'प्रिकोम प्रोम फ्रेम' या मशिनमध्ये येतो. कापसाचे शुध्दिकरण होऊन तो कापूस नंतर प्रिपेटरी या विभागाकडे येतो. इथे कापूस आणखी बारीक करण्याचे काम चालू असते. हा कापूस 'सुपर लॅब' या मशिनमध्ये येतो. यात आपोआप वजन होते. २० किलो वजन भरले की तो बंडल ती मशिन बाहेर टाकते. सुपरलॅब मधील बंडले 'होम वर्क' या मशिनमध्ये ठेवली जातात. चार मशिन मधून येणाऱ्या वातींची म्हणजे चार वातींची एक वात याप्रमाणे दोन वाती तयार होतात व त्या कॅनमध्ये भरतात. एक कॅन भरायला दोन तास लागतात. नंतर हे कॅन ड्रॉइंग विभागाकडे येतात. इथे वात आणखी बारीक होत जाते. इथे एका वेळेला १६ कॅन लागतात.

'स्पिड फ्रेम' या ओळीने अनेक मशिन लावलेल्या असतात. एका वेळेला ११६ कॅन लागतात व इथे ही वात आणखी बारीक होते. नंतर 'ॲटो कुलर' या मशिनमध्ये ती बारीक केली जाते. इथे एका प्लॅस्टिकच्या कांडीला दोरा गुंडाळला जातो. त्याला 'स्प्रींडर'असे म्हणतात. या स्प्रींडरची वाहतूक केली जाते. पुढे ७ मशिन्स् आहेत. त्या स्प्रींडरचे दोरे आत ओढून घेतात. एका वेळेला ४ स्प्रींडरचे दोरे एक मशिन आत घेते. पाठीमागील बाजूस दोरा गुंडाळायला सुरुवात होते. जर दोरा जाड आला असेल तर ते मशिन तो दोरा मध्येच तोडते व पुन्हा दुसरा दोरा ओढून घेते. हे सर्व काम ॲटोमॅटिक चाललेले असते. ८ तासात १६००० कोन गुंडाळून बाहेर पडतात. नंतर ते कोन 'रिंग फ्रेम' या मशिनमध्ये येतात. इथे एका विभागात ४२ मशिन्स् आहेत. एका मशिनला ६०० कांड्या लागतात. ह्या कोनाचा २ किलोचा एक बंडल याप्रमाणे बंडल तयार होतात व बाहेर पडतात. नंतर ही बंडले पॅकिंग विभागाकडे नेली जातात. इथे 'आल्ट्राव्हायलेट' नावाचे मशिन आहे. त्यात बंडल ठेवतात. जर त्या बंडलामध्ये वेगळ्या प्रकारचे म्हणजे अशुध्द सूत आल्यास लगेच दिसते. ही सर्व तपासणी झाल्यावर प्लॅस्टिकच्या पिशवीत लेबल लावून पॅक करतात. नंतर त्या बंडलाचे वजन करतात. एका बंडलचे दोन किलो याप्रमाणे २४ बंडलाचे वजन करून ती सर्व बंडले व्यवस्थित एका पॅकिंगमध्ये घालतात.

**कामगार व व्यवस्थापन :**

नवमहाराष्ट्र सहकारी सूतगिरणीची स्थापना झाली तेव्हा ४ ते ५ कामगार होते. या गिरणीची स्थापना ''महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह ॲक्ट'' प्रमाणे झाली. पण जेव्हा प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात झाली तेव्हा कामगारांची संख्या २०० होती. या सहकारी सूतगिरणीत कामगार

नेमल्यानंतर ते प्रशिक्षित केले जातात. त्यांना योग्य ते प्रशिक्षण दिले जाते. ज्याला एका यंत्रावरील काम योग्य रीतीने करता येईल त्याच यंत्रावर त्याची नेमणूक केली जाते. त्याचप्रमाणे ही सूतगिरणी सध्या ऊर्जितावस्थेला असल्यामुळे प्रथम सूतगिरणीचा विचार केला जातो. तसेच या गिरणीला मिळणाऱ्या नफ्यावर कामगारांच्या हिताचा विचार केला जातो. या सूतगिरणीचे भवितव्य प्रथम सुव्यवस्थित करण्याचा मानस व्यवस्थापनाचा आहे. तरीही कामगारांच्या सहभागाचा विचार व्यवस्थापन करते. या सूतगिरणीत सध्याची कामगारसंख्या ४९६ इतकी आहे. कामगारांना आवश्यक सुखसोयी उपलब्ध आहेत. त्या पुढील प्रमाणे १) स्टँड २) युनिफॉर्म ३) बोनस ४) ग्रॅच्युइटी ५) विमायोजना ६) अपघात विमायोजना ७) नुकसान भरपाई इ. या सूतगिरणीतील मशिनरी ॲटोमॅटिक आहेत. त्यामुळे कापसाचे कण जास्त उडत नाहीत. परंतु जे थोड्याफार प्रमाणात उडतात त्यासाठी ठिकठिकाणी एअर कुलर बसविलेले आहेत. त्यामुळे कापसाचे किंवा धूळीचे कण कमी प्रमाणात तपमान राखून प्रदूषण कमी केले जाते. त्यातूनही कापसाचे कण उडालेच तर प्रत्येक मशीनरीला एअर प्रेशर बसविले आहेत. त्याच्या मार्फत उडालेले कण शोषले जातात. या सूतगिरणीतील काम तीन शिफ्टमध्ये चालते.

८तासांच्या कामानंतर त्यांच्यासाठी व्हॉलीबॉल, क्रिकेट, फुटबॉल व कॅन्टिन इ. सोयी-साधने उपलब्ध आहेत. या गिरणीतील कामगारांना प्रशिक्षणासाठी बाहेर पाठविले जात नाही तर त्याना सूतगिरणीतच प्रशिक्षित केले जाते. या सूतगिरणीत प्रशिक्षित झालेल्या कामगारांना बाहेरच्या दुसऱ्या सूतगिरणीत जास्त वेतन देऊन घेतले जाते. त्याचप्रमाणे येथील कामगार ''नवमहाराष्ट्र सहकारी संघटनेशी'' रांबंधित आहेत. ही संघटना 'इंटक' या राष्ट्रीय संघटनेशी संबंधित आहे.

**सूतगिरणीचे समाज व शासनाशी संबंध :**

नवमहाराष्ट्र सहकारी सूतगिरणीत ॲटोमॅटिक मशिनरीमुळे थोड्या प्रमाणात तरी कापसाच्या बारीक कणांचा कामगारावर अल्पसा परिणाम होऊ शकतो. कामगाराला काही वर्षांनी रोग होण्याची शक्यता असते. गिरणीने या विषयी दक्षता घेतली आहे. या सूतगिरणीतील कामगाराला गिरण चालू झाल्यापासून कोणतीही इजा झाली नाही. आरोग्य, अपघात इ. विषयी योजना तात्काळ कार्यान्वित करण्यात येते. या सूतगिरणीविषयी समाजाचे मत चांगले आहे. या गिरणीने देशाला परकीय चलन मिळवून दिले. एक नावलौकिकास आलेली ही मिल आहे. शासनाच्या बदललेल्या धोरणांचा, कायद्यांचा परिणाम या गिरणीवर होतो. रुपयाचे अवमूल्यन झाले तेव्हा यांचा माल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत होता. त्यामुळे भारतास अधिक परकीय चलन मिळाले. या गिरणीतील मालाचा दर्जा उच्च आहे. कापसांच्या गठ्ठ्यातून चांगला व वेस्टेज कापूस वेगळा केला जातो. कामगार कल्याण कायद्याची अंमलबजावणी केली जाते. या गिरणीचे इतर सर्व गिरणींशी सहकार्याचे संबंध आहेत. बदलत्या राजकीय धोरणांचा परिणाम हा दूरगामी होऊ नये याची दक्षता व्यवस्थापक घेतात या गिरणीतील औद्योगिक संघटन सहकारात्मक स्वरूपाचे आहे. संघटन तक्त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी होत आहे.

**गटप्रमुख**

कु.सुचेता शुभचंद्र टक्कळकी. कु.वनिता तुकाराम जानकर
कु.पद्मा शंकरराव लाड कु.अनिता जनार्दन डोंगरे

★★★★

# निर्णय

*निर्णय घेता न येणे या सारखा दुसरा*
*घातक दोष नाही,निर्णय न घेण्यापेक्षा*
*चुकीचा निर्णय घेणे हे अधिक बरे.*
*चुकीचे निर्णय घेणाऱ्या माणसांनी*
*जीवनात यश मिळवलेले आहे.*
*परंतु जो निर्णय घेवु शकत नाही त्याचे मन*
*नेहमी "हे की ते" च्या गोंधळात गुरफटलेले असते.*
*असा मनुष्य मात्र कधींच*
*यशस्वी झाल्याचे ऐकिंवात नाही.*
*ज्याला निर्णय घेता येत नाही*
*त्याला कृती करता येत नाही आणि*
*ज्याला कृती करता येत नाही*
*त्याला कोणत्याही क्षेत्रात*
*यश मिळविता येत नाही.*

***निर्णयात विजय आहे.***

**कु.मंजुषा देसाई** / बी.कॉम तृतिय वर्ष

# म. फुले यांचे स्त्रीविषयक विचार



कु.विद्या शिवाजीराव जाधव
बी.ए.भाग-१

जेव्हा छळवाद असह्य होतो तेव्हा त्या विरुद्ध असंतोषाची आग धुमसू लागते. प्रसंगपरत्वे भडकतेही. हिंदू धर्माच्या रूढी स्वरूपाबद्दल व धर्माच्या नावाखाली रूढ केलेल्या चालीरिती, व्रतवैकल्ये आदिबद्दल तसेच देवाधर्माच्या नावाखाली चाललेल्या पुंडाईबद्दल सबंध देशभर असंतोष निर्माण झाला. वाघिणीचे दूध चाखलेल्या लोकांची मेंढरीवृत्ती नाहीशी झाली. चौकस व चौरस वृत्तीचे बाळकडु त्यांना मिळाले. विज्ञानाचा स्पर्श होऊन त्यांना चिकित्सेच्या पायावर आधारलेली नवी दृष्टी प्राप्त झाली. चिकित्सक दृष्टिकोनातून पाहताना त्यांना रूढ धर्माचे स्वरूप भोंगळ व ओंगळ दिसू लागले ते त्यांना कालबाह्य व त्याज्य वाटू लागले. मानवतेची अमानुषपणे हत्या करणाऱ्या सती, केशवपन, बालहत्या, जातिभेद, अस्पृश्यता आदि रोगजंतूनी रूढ धर्म जर्जर झाल्याचे त्यांना कळून चुकले म्हणून मानवतेच्या रक्षणासाठी व सोज्वळ उपासनेसाठी अनेक पंथाची स्थापना झाली. राजाराम मोहन रॉय यांनी ब्राम्हो-समाज, न्यायमूर्ती रानडे, डॉ.भांडारकर व सर चंदावरकर यांनी प्रार्थना समाजाची स्थापना केली. महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाचा पाया रचला.

ब्रिटीश राजकर्त्यांशी आलेले संबंध आणि पाश्चात्य संस्कृतीचे घडलेले दर्शन यामुळे पाश्चात्य विद्याविभूषित भारतियांना भारतीय समाजरचनेतील अनर्थावह अटींची प्रकर्षाने जाणीव झाली. अशा जाणत्या लोकांमध्ये महाराष्ट्रातील बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख, न्या.रानडे, डॉ.भांडारकर, जोतिराव फुले, आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, महर्षि कर्वे इ. प्रमुख होत.

सुरवातीच्या सुधारकांची स्थिती मोठी चमत्कारिक होती. एखादी सुधारणा व्हावी हे त्यांना मनोमनी पटे. मग त्या सुधारणेचे समर्थन ते हिरीरीने करीत. त्यात आवेश युक्तीवाद व कळकळही असे परंतु प्रत्यक्ष कृती करण्याची पाळी स्वत:वर येऊन ठेपली की मग मात्र ते या ना त्यां कारणाधारे माघार घेत.

वैयक्तिक बाबतीतच असे घडत असे नव्हे तर सार्वजनिक संस्थातही असेच प्रकार चालत. आपल्या वहिनीला स्त्री-शिक्षण संस्थेत प्रवेश मिळविण्यासाठी कर्मवीर वि.रा.शिंदे यांनी कर्वे यांच्याशी संपर्क साधला तेव्हा मराठ्यांच्या मुलींना वसतीगृहात प्रवेश देण्याचा काळ अद्यापी आला नाही असे सांगून कर्व्यांनी बोळवण केली. संस्था सार्वजनिक म्हणून काढल्या असल्यातरी त्यांना निर्भेळ सार्वजनिक स्वरूप येऊ शकले नाही. प्रतिगामी सनातन्यांच्या धास्तीमुळे असले प्रकार घडत होते आणि त्यामुळे सुधारक मात्र 'बोलके' या सदरात मोडत होते. अशा स्थितीतही सुधारकानी सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात केलेले प्रबोधनाचे कार्य मौलिक होते.

१९ व्या शतकात महाराष्ट्रात जे सामाजिक प्रबोधन घडले त्या प्रबोधनाचे शिल्पकार होते 'महात्मा जोतिराव फुले'. त्यांच्या कार्याची आणि विचारांची थोरवी आज वादातीत सिध्द झाली आहे. म.फुले म्हणजे आचार आणि विचार यांच्या एकसंघ साहचर्याचे मूर्तिमंत रूप होते. जोतिबा हे सुमारे २१ वर्षाचे झाले. त्यांनी हिंदु स्त्रीला तिच्या प्राचीन गुलामगिरीतून मुक्त करण्याचा विडा उचलला. भारताने स्त्रियांना आणि शूद्रांना शिक्षणापासून दूर ठेवले होते. अज्ञान म्हणजे अंधार व शिक्षण म्हणजे प्रखर सूर्यप्रकाश हा प्रकाश अज्ञानांधकार नष्ट करून मनुष्याचे जीवन चैतन्यमय करून सोडतो.

कोणत्याही समाजात द्रुत गतीने स्थित्यंतर घडवून आणण्यापूर्वी शिक्षणाचा प्रसार करणे अत्यावश्यक असते. शिक्षणांने मनुष्याला सत्य-असत्याचा नि अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ती प्राप्त होते. स्वाभिमानाची जाणीव त्याच्यात जागृकत होते म्हणून शिक्षण ही सर्व सुधारणेचे मूळ आहे.

यास्तव स्त्रिया व शूद्र यांना ज्ञानाचे दरवाजे खुले करावयाचे असा जोतिबांचा ठाम निर्धार झाला. ''जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी,'' ह्या सत्याचा प्रत्यय आला होता. गुरूणांमाता गरियसी, यांची थोरवी त्यांना पटली होती. दीर्घ विचारांनी, मुलींकरता एक शाळा काढावी असे त्यांनी ठरविले कारण मुलांच्या भवितव्याचे मार्गदर्शन मातांकडून यशस्वी रीतीने होऊ शकते. स्त्रियांना आपल्या कर्तव्याची नीट जाणीव झाली,की देशाची प्रगती फार झपाट्याने होईल असे त्यांना वाटले. जोतिबा हे नवयुगाचे एक प्रतीकच होते. आत्मसमर्पणाच्या उदात्त आणि विलक्षण विचारांनी ते भारलेले होते. स्त्रियांच्या व शूद्रांच्या उध्दारकार्याचा श्रीगणेशा करण्यास ते उतावीळ झाले होते.

मुलींची शाळा काढण्यापूर्वी आपण कोणत्या गोष्टी केल्या ह्या - विषयी जोतिबा म्हणतात.''माझ्या देशबांधवापैकी महारमांग, चांभार, या कनिष्ठ जातीतील बंधु हे दु:ख आणि अज्ञान यांत साफ बुडालेले आहेत त्यांची स्थिती सुधारण्यासाठी दयाळू देवाने मला प्रेरणा दिली. स्त्रियांच्या शाळेने प्रथम माझे लक्ष वेधले पूर्ण विचारांनी माझे असे मत झाले की पुरूषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. स्त्रिया आपल्या मुलांना त्याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजे असतात. अशा विचारात मी असताना अहमदनगर येथील अमेरिकन मिशन मधील मिस.फॅरार या बाईनी चालविलेल्या शाळा मी एका मित्रासमवेत पाहिल्या. ज्या पध्दतीने त्या मुलींना शिक्षण देण्यात येत होते ती पध्दत पाहून मी फार खुश झालो.''

हिंदुस्थानात स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यात येते याबद्दल जोतिबा आणि गोंवडे यांच्याजवळ मिस फॅरारने अत्यंत दु:ख व्यक्त केले. आपल्या देशाची सुधारणा करण्यासाठी परकीय लोक चिकाटीने जे प्रयत्न करीत होते ते पाहून जोतिबा व गोंवडे यांच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. यास्तव प्रत्येकाने आपल्या पत्नीस शिक्षण देऊन शिक्षण प्रसाराच्या कार्यात तिचे सहाय्य घ्यावे असे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे जोतिराव पुण्यास परत आल्यावर त्यांची पत्नी सावित्रीबाई यांचे शिक्षण सुरू करण्यात आले व त्यांनी स्वत: कनिष्ठ वर्गातील मुलींसाठी एक शाळा सुरू केली मात्र त्या शाळेत ज्या मुलांना शिक्षण घेण्याची आवड असेल त्यांनाही प्रवेश दिला.

जोतिबांनी मनुस्मृतीला आव्हान दिले. सामाजिक परंपरा चालीरिती जोतिबांनी धुडकावून लावल्या म्हणून सनातनी धर्म मार्तंड आक्रोश करू लागले की 'सनातनीपणा हाच आमचा धर्म आहे. आमचा धर्म धोक्यात आला आहे. जोतिबा हा समाजाचा शत्रू आहे. पिढ्यानुपिढ्या क:पदार्थ गणलेल्या कुळातला हा वंशज आहे.' जोतिबांच्या जातभाईंकडून त्यांनी त्यांना 'तुमच्या कृत्याचे परिणाम भोगावे लागतील' असे धमकावले होते. परंतु त्यांच्या धमक्यांना त्यांनी भीक घातली नाही.

उलट जोतिबांनी दुसरी अशी एक गोष्ट केली की त्यामुळे सनातन्यांची माथी अधिकच भडकली. महार - मांगांच्या मुलींच्या शाळेत त्यांना दुसरा शिक्षक मिळत नव्हता तेव्हा त्यांनी आपल्या पत्नीला मुलींना शिकवण्यासाठी सहाय्यक शिक्षक म्हणून शाळेत आणले. एका हिंदू बाईने शिक्षिकेचे काम केले. ही बाब त्याकाळी अत्यंत समाजद्रोही आणि धर्मद्रोही मानण्यात आले. तो सनातन्यांना राष्ट्रीय अपमान वाटला. सावित्रीबाई शाळेत जात असताना मार्गात त्याच्या अंगावर चिखल फेकीत, घाण टाकीत, दगड मारीत, प्रतिदिन हे दु:ख त्यांना सहन करावे लागे.

विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न हा जरी ब्राम्हण आणि तत्सम ह्या उच्च जातीशी निगडीत होता, तरी विधवांची ती दैन्यावस्था पाहून जोतिरावाचे मन गहिवरले. त्याचा नैतिक अध:पात त्याना पाहवत नसे. भृणहत्येच्या रक्ताने माखलेले त्यांचे हात पाहून त्यांच्या मनात दु:खाचे कढ येत. अन्यायाचा प्रतिकार करणे हा जोतिरावांचा बाणा! त्यांनी स्त्रियांच्या पुनर्विवाहाच्या चळवळीस सक्रिय पाठिंबा देऊन तीत पुढाकारही घेतला. हिंदू स्त्रीला तिच्या जुनाट बंधनातून मुक्त करावयाचे

होते. हिंदू स्त्री आता सुधारणेच्या मार्गावर येऊन ठेपली होती. तिच्या जीवनात आता मोठे स्थित्यंतर घडणार होते. 'शेणवी' जातीतील एका विधवेच्या एका शेणवी विधुराबरोबर ८ मार्च १८६० रोजी पुण्यात पुनर्विवाह झाला ती विधवा अठरा वर्षांची होती. ती बातमी प्रसिध्द करून 'ज्ञानप्रकाशाने' असे म्हटले की आम्ही याच्यावर काही मत देण्याची आवश्यकता नाही. जोतिराव यांनी १८६४ साली एका शेणवी विधुराचा पुनर्विवाह घडवून आणला असे ते म्हणतात. तो पुनर्विवाह वर उल्लेखिलेला असावा असे दिसते.

विधवांच्या दुष्कृत्यामुळे गुन्हे आणि शोककथा निर्माण होत. उक्ती आणि कृती यांचा सुंदर संगम झालेले स्वप्नाळू व कृतीशूर जोतीराव यांनी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आणि मुले येथे ठेवण्यासाठी एक बालहत्या प्रतिबंधकगृह स्थापन केले. त्याची माहिती देणारी भित्तीपत्रके पुणे शहरात घराघरावर लावण्यात आली. 'विधवांनो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा, तुम्ही आपले मूल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील त्या मुलाची काळजी हा अनाथालय घेईल'.

जोतिरावांचे बालहत्या प्रतिबंधकगृह ही भारतातील अशा स्वरूपाची पहिली संस्था होय. ती एका ब्राम्हणेतरानी मोठ्या धैर्याने दयाभूत अंतःकरणाने आणि परोपकारी वृत्तीने विशेषतः ब्राम्हण विधवांसाठी काढली होती. ब्राम्हण विधवांना दुष्कीर्ती, भृणहत्या आणि बालहत्या यापासून वाचविण्यासाठी आणि ब्राम्हण विधवांना आत्महत्येच्या व पोलीस कारवाईच्या पाशापासून वाचविण्यासाठी त्यांनी ही संस्था काढली होती. जरी ती संस्था गरोदर स्त्रियांसाठी काढली होती तरी त्या हेतूचा दुसरा एक चांगला कळत न कळत परिणाम घडला. खिस्ती मिशनकडे अशी जी अनाथ मुले जात ती जाणे बंद झाले.

जोतिरावांना मूलबाळ नसल्याने त्यांच्या वडिलांना अत्यंत दुःख होई. त्यांनी दुसरे लग्न करावे म्हणजे त्यांना मुले होतील असा त्यांचा उपदेश त्याना होता. जोतिरावांच्या श्वशुराकडील मंडळीनीही त्यानी दुसरा विवाह करावा अशी इच्छा प्रकट केली. जोतिरावांना हे ऐकून अत्यंत दुःख झाले. त्यांना त्या 'विचाराची चीड आली. 'जर एखाद्या जोडप्याला मूल झाले नाही, तर स्त्रीवर वांझोटेपणाचे आरोप करणे हे अत्यंत निर्दयपणाचे कृत्य आहे. तिच्या पतीत वांझोटेपणाचे काही दोष नसतील कशावरुन?' असे आपले विचार ते स्वतंत्रपणे बोलून दाखवीत. अशा स्थितीत त्या स्त्रीने 'मी दुसरा नवरा करणार आहे, असे म्हटले तर तिच्या नवऱ्याला काय वाटेल? त्याला तो अपमान व मानखंडना वाटणार नाही काय? पुरुषाने पहिल्या पत्नीपासून मूल नाही म्हणून दुसरा विवाह करावा ही अत्यंत निष्ठूर अन हृदयशून्य चाल आहे' असे जोतिरावांचे म्हणणे होते. जोतिरावांच्या पत्नी सावित्रीबाई, बालहत्या प्रतिबंधक गृहातील मुलांची अविरतपणे, वात्सल्याने सेवा करीत, लालनपालन करीत.

एकोणिसाव्या शतकातील भारतातील शैक्षणिक इतिहास काही व्यक्तींच्या नावाशी निगडीत झालेला आहे असे म्हटले जाते. त्या व्यक्तींपैकीच जोतिराव फुले हे एक होत. स्त्रियांच्या हक्कासाठी उद्धारासाठी त्याग करणाऱ्या आणि कष्ट भोगणाऱ्या जोतिरावांचा 'स्त्रियांचा उद्धारकर्ता' म्हणून सत्कार झाला.

★★★★

## ■ हे अजिबात खोटे नाही ■

आफ्रिकेतील 'मृंदुका' टोळीतील लोक आपल्या मुलीच्या जन्मदिवशीच तिच्या गळ्यात एका मुलाचा दात बांधतात. ती मुलगी उपवर झाल्यावर त्याच मुलाशी तिचे लग्न होते.

o o o o o o o o o o o o o o o o o o o o o o o o o o o



# माझे आवडते नाटक

## ''तुझे आहे तुजपाशी''


कु.प्रतिभा कल्लाप्पा लंबे.

बी.ए.भाग - २


श्री. पु.ल.देशपांडे यांनी अनेक प्रकारची नाटके लिहिली; विनोदी लेखनातही त्यांनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या अनेक यशस्वी नाटकांपैकी विलक्षण गाजलेले नाटक म्हणजे ''तुझे आहे तुजपाशी''. या नाटकातून पु.ल.देशपांडे आपल्याला दैनंदिन व्यवहाराशी संबंध असणाऱ्या व्यक्ती कशाप्रकारे असतात याचे दर्शन घडवितात.

या नाटकाच्या उत्कृष्ट कथानकामुळे हे नाटक फार आवडते. हे नाटक लिहिताना प्रत्यक्षातील काही व्यक्तींवर लिहिलेले आहे असा समज आहे. प्रसिद्ध गायक रामूभैय्या दाते आणि प्रसिद्ध सर्वोदयी आचार्य भागवत या व्यक्ती त्यांच्यासमोर होत्या असे म्हटले जाते परंतु तरीही हे नाटक अत्यंत वेधक आणि मनोरंजक झाले आहे.

इंदूर शहरातील अत्यंत श्रीमंत-राजविलासी बापूभैय्या देवासकर यांच्या घराण्यातील काकाजी देवासकर आहेत. तरीसुध्दा त्यांच्या एकंदरीत व्यक्तिमत्वावरून ते तरुणपणी खूप वेगळे व रूबाबदार असावेत याची कल्पना येते. दणदणीत गोरीपान शरीरयष्टी, अणुकुचीदार छोटीशी दाढी आणि भरघोस मिशा, असे काकाजींचे एकंदर व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या अंगात लखनौ पध्दतीचा कलाकुसर केलेला अंगरखा आणि सुरवार आहे. हुक्क्याचा झुरका घेत आपल्या पुतण्याबरोबर ते बुद्धिबळ खेळत असलेले दिसतात. दिवाणखान्याच्या सजावटीवरुन शिकारीचा व गायकीचा छंद असलेले काकाजी दिसतात. याशिवाय उत्तम राहणे, उत्तम खाणेपिणे अशाप्रकारे जीवनाचा चौफेर उपभोग अतिशय रसिकपणे घेणारे काकाजी वाचकांच्या व प्रेक्षकांच्या लक्षात चटकन् राहतात. जीवनातील दु:खे पचवून आशावादी जीवन जगणारे काकाजी आपल्याला दिसतात.

शाम आणि उषा ही त्यांच्या भावाची मुले आहेत. त्यांचा भाऊ व वहिनी टॉयफॉईडच्या साथीत वारल्यानंतर काकाजीनी त्यांच्या मुलांना आपल्या मायेच्या पंखाखाली घेतले. पोटच्या मुलांप्रमाणे त्यांचा सांभाळ केला. शाम इंजिनिअरींग कॉलेजात शिकत आहे. तर उषा ही राष्ट्रप्रेमाने भारलेली आहे. त्यासाठी तिने आपल्या प्रेमालाही तिलांजली दिली आहे. तिचा प्रियकर डॉ. सतीश हा तिच्या प्रेमासाठी आठ-दहा वर्षे झाली तरी अद्यापही अविवाहित राहिलेला आहे. वासुअण्णा हा काकाजींच्या घराण्यातील पिढीजात कारकुनी करणाऱ्या डिके घराण्यातील कारकुन आहे. भिकू हा बागेचा माळी आहे. तर जगन्नाथ हा काकाजींच्या गाडीचा ड्रायव्हर आहे. काकाजींच्या घरात मालक व नोकर असा भेदभाव नाही. अशा या मोकळ्या-चाकळ्या वातावरणात अचानकपणे व योगायोगाने आचार्य येतात. आणि घराचा नूराच पालटून जातो. त्यांच्यासोबत त्यांची मानलेली मुलगी गीता येते. उषाचा प्रियकर डॉ. सतीश हा आचार्यांचा भाचा आहे. आचार्य हे काकाजींच्या अगदी उलट स्वभावाचे आहेत. जीवनाकडे संपूर्णपणे पाठ फिरवून विरक्त असे जीवन ते जगतात. गांधीवादी सर्वोदयवादी अशी त्यांची विचारसरणी आहे. जेवणात त्यांना गाईचे तूप, हातसडीचे तांदूळ, काळ्या मनुका लागतात. त्यामुळे त्यांचे जीवन आपल्याला बाह्यत: रुक्ष बनलेले दिसते. त्यांच्या मानवी भावना मरून गेलेल्या आहेत. चरख्यावर सूत काढून त्याचे कपडे वापरणे, सर्व गोष्टींत संयम पाळणे, शारीरिक भावना दडपून टाकणे, असे एकंदर त्यांचे विचार आहेत.

हेच संस्कार गीतेवर झाल्यामुळे ती अकाली प्रौढ बनलेली आहे. परंतु काकाजींच्या घरातील प्रसन्न वातावरणामुळे तिच्यात बदल घडून आलेला दिसतो. काकाजींचा पुतण्या शाम याच्यावर ती अनुरक्त झाली आहे. व उषाने हे जाणले आहे. म्हणून ती गीतेला जॉर्जेटचे पातळ नेसवून तिला नटवते व शामबरोबर सिनेमाला जायला सांगते. अर्थात हे आचार्यांना आवडत नाही. शामही गीतेवर प्रभाव टाकण्यासाठी आचार्यांची कार्यपध्दती व जीवनपध्दती आचरतो. याचे सतीशला व उषेला आश्चर्य वाटते. आपण सतीशचे प्रेम उगीचच ठोकरले याची जाणीव उषेला होते. प्रेम ही एक मानवी भावना आहे. आणि ती व्यक्त करणे पाप नाही हेही तिला कळून चुकले. उलट आचार्यांची जीवनपध्दती मानवी भावनांच्या किती विरुध्द आहे हे तिला समजते. काकाजीदेखील आचार्यांना त्यांचे वागणे कसे चुकीचे आहे हे समजावून सांगतात. आचार्यांनाही ते समजते शेवटी शाम आणि गीता, सतीश आणि उषा यांचे मिलन होते. आचार्य निघून जातात आणि येथेच हे नाटक संपते.

''तुझें आहे तुजपाशी'' या नाटकात पु.ल.देशपांडे यांनी जीवनातील विरक्तपणा आणि जीवनातील आनंदीपणा हे दोन्ही परस्परविरोधी गुण अतिशय उत्कृष्टपणे रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. या नाटकातील सर्व व्यक्तिमत्वांचे दिमाखदार वर्णन आपल्याला मोहित करून टाकते. त्यापैकी काकाजींचे व्यक्तिमत्व इतके प्रभावी रंगविले आहे की काकाजी वाचकांच्या व प्रेक्षकांच्या मनाची पकड घेतात. या नाटकातील काकाजी ही मध्यवर्ती भूमिका प्रभावी ठरते. त्यांचे जीवनविषयी विचार मनाला पटतात. जीवनाचा अत्यंत रसिकतेने आस्वाद घेणे हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय आहे. असे काकाजी वाचकांच्या व प्रेक्षकांच्या स्मरणात चिरकाल राहतात असे हे वेगळेपण यातून दिसते. त्यामुळे नाटकाची गोडी अधिक निर्माण होते.

हसू आणि आसूंचा खेळ खेळत रसिकपणे, दिलदारपणे जीवन उपभोगावे आणि माणुसकी टिकवावी असे काकाजींच्या भूमिकेवरून प्रेक्षकांना कळते. काकाजी ही अमर व्यक्तिरेखा आहे. बाह्यांगी अतिशय विनोदी परंतु अंतर्यामी महान तत्त्व सांगणारी अशी ही नाट्यकृती आहे.

★★★★

*'तुम्हास जर स्त्रियांचे तसे आचरण आवडणार नाही, तर आपणा सर्व पुरुषांचे त्याच मासल्याचे आचरण स्त्रियांस तरी कसे आवडेल? कारण स्त्री आणि पुरुष एकसारखे. एकंदर सर्व मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र असता स्त्रियांस एकतऱ्हेचा नियम लागू करणे व लोभी, धाडस पुरुषास दुसरा नियम लागू करणे हा निव्वळ 'पक्षपात' होय. उदाहरण 'स्त्रियांचे ते पुरुषांचे आणि पुरुषांचे ते हुं हुं? त्याचप्रमाणे काही धाडसी पुरुषांनी आपल्या जातीच्या स्वार्थासाठी बनावट मतलबी धर्मपुस्तकात स्त्रियांविषयी असे आपमतलबी लेख करून ठेविले आहेत.'*

***(सार्वजनिक सत्यधर्म - जोतीराव फुले)***

●●●●●

*जोतीरावानी थॉमस पेन यांचे 'द राइट्स ऑफ मॅन' हे पुस्तक वाचले होते. फ्रेंच राज्यक्रांतीच्या अपूर्व अशा ऐतिहासिक घटनेने भारावून गेलेल्या थॉमस पेनने त्या क्रांतीतून निष्पन्न झालेली मानवी व्यक्तीच्या नैसर्गिक हक्काची आणि प्रतिष्ठेची प्रभावी बाजू आपल्या पुस्तकातून विशद केली आहे. थॉमस पेनचे व्यक्तिमत्व आणि जोतीरावांचे व्यक्तिमत्व यात कुठेतरी साम्य असले पाहिजे.*

●●●●●

*मानवतावाद, विश्वबंधुत्व आणि कृतिशीलता ही जोतीरावांच्या जीवननिष्ठेची तीन प्रमुख अंगे आहेत विचार आणि कृती यांचे अद्वैत हे त्यांच्या जीवनाचे खास वैशिष्ट्य होते. म्हणूनच आज इतक्या कालावधीनंतरही त्यांचे व्यक्तित्व, विचार आणि कार्य सामाजिक कार्यकर्त्यांना स्फूर्तीदायक होत आहे.*



# चित्तरकथा

कु.उन्मना बाजीराव पाटील.
११ वी आर्टस् ब

झाडाच्या गार सावलीत कोंडीबा गुडघ्यात मान घालून बसला होता. मनात अनेक विचारांचे काहुर माजले होते. यापुढे आपले कसे हुनार, आपले शेवटी काय हुनार, न जानों आपल्याला मध्येच काहीतरी घडले तर? आपल्याला ना आई-बाप, ना बहिण-भाऊ आपण आता चुलत्याच्या जिवावर वाढणार. चुलता आपले शेवटी भले करेल काय? अशा तंद्रीत असतानाच त्याच्या कानावर चुलत्याचे शब्द पडले.

''काय रं कोंड्या! असा का डुकरांसारखा बसलायास? त्या ढोरांकडनी लक्ष दे, बघ कशी दावी तोडाय लागल्यात''. त्यावर कोंडीबा घाबरून म्हणाला,''आँ! व्हय आण्णा, माझं लक्ष हाया. आताच वैरणीचा बिंडा आणलाया, आता ढोरांना पाणी दाखवून शेतावर जाणार हाया.''

''आरं व्हय पर एक राहिलं बघ, कोंड्या तेवढी ती शेणाची पाटी घेऊन घराकड जा, गॅसात शेण घालाय पाहिजे. रातच्यानं गॅस पेटल्याला न्हाय''

कोंडीबा शेणाची पाटी घेऊन घराच्या वाटेला लागला. पण तेव्हा त्याच्या मनात विचार चालूच होते. आपण एकटे आपली आठ एकर जमीन चुलत्याकडच आणि चुलत्याचा मुलगा दोन मुली ही समदी आणि चुलती चुलत भावाची बायको त्यांची मुले ही समदी कशी वागत्यात आणि आपन मात्र असे चाकरीच्या गड्यागत समदी काम करतो. वाड्यावर ही समदी राहतात आणि आपन मात्र म्हशीची राखाण करत गोठ्यात न्हातुया. छ्या,छ्या आपन आता न्हाय असं वागायचं, आपन चांगल वागायचं, आपली जमीन चुलत्याकडून काढून घियाची, आपल्याला बायकु तरी कोण देणार? आपन तर अगदी बुटके, काळे, अडाणी आपली कायाच येगळी, तवा आपलं लगीन कसं हुणार? आपल्या वयाबरोबरच्या भावाचं लगीन होऊन दोन मुलंबी झाली. बहिणींची लग्न होऊन त्यांनाबी मुलं झाली आणि त्या सुखानं सासरी नांदत्यात आणि आपण मात्र अजून बसलुया तसचं, लहानपणी आईवडील मेले तवा मामाकड चाकरी केली आणि आता चुलत्याकड चाकरी करतुया. ह्या समद्या जमीनीत आणि वाड्यात माझी निम्मी वाटणी हाया पर आपल्याला हे समद अखेर मिळल का? अशा गोंधळात असताना वाडा केव्हा आला ते समजलंच न्हाय.

''आरं ये कोंड्या, ते श्यान तेवढं लागलच हे खरकट पाणी नेऊन कालवून सोड आणि जेवायला ये.''

कोंडीबा गॅसमध्ये शेन घालून हातपाय धुवून जेवायला बसला. जेवणात शिळी भाकरी, रात्रीचे ताक आणि भात, कोरड्यास, लहान मुलाचे उष्टे एवढेच. त्याला ते जेवन चांगलंच वाटायचं. परंतु घरातील इतर सर्व सकाळी चहा-बिस्कीटे खात. बरोबर नाश्ता करीत. शिरा पोहे असे अनेक पदार्थ असायचे परंतु कोंडीबाला वाटायचं आपण जे खातो तेच हे सर्व खात असतील. त्याने ते जेवण भराभर खाल्ले आणि रिकामी पाटी घेऊन जाणार तोच वहिनी म्हणाली, ''रावसाब, पाणी आणायचं हाया, पाणी भरून मग जा शेडकड, एवढ्या लवकर काय काम हाय तिकड.''

कोंडीबाने घरातील सर्व पाणी कावडीने आणून भरले. आणि तेवढ्यात दादा म्हणाला,''कोंड्या आता शेडकड जाऊन तेवढ माळात ऊसाला पाणी धर''

अशा प्रकारे कोंडीबाकडून गोड गोड बोलून त्याच्याकडून कामे करून घेत आणि कोंडीबा दिवसेनदिवस

विचार करीत असे.

एके दिवशी ढोरांना वैरन नव्हती. आण्णानं तर कोठलीही वैरन आणून ढोरांना घालाय सांगितली होती. कोंडीबाने ठरवलं शेजारच्या भावकीतील येसबाच्या शेतातील मक्का गुपचूप काढून आणायचा. त्याप्रमाणे त्याने तो मक्का काढावयास सुरुवात केली. एक बिंडा झाला बांधला आणि डोसक्यावर घेणार एवढ्यात येसबाची बायको तेथे आली आणि तिने त्याला पाहिले. अगोदरच कोंडीबाच्या चुलत्याचा आणि येसबाचा छत्तीसचा आकडा त्यात कोंडीबाने केलेली मक्क्याची चोरी म्हणजे येसबाच्या बायकोने त्याचे कुसळाएवढे होते ते मुसळाएवढे केले. तिने त्यास शिव्याची लाखोली वाहिली. तिने येसबास बोलावून, कोंडीबाने केलेल्या मक्क्याच्या चोरीची वार्ता सांगितली. येसबाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याने लगेच पोलिसात ही बातमी सांगितली. कोंडीबास अटक झाली.

आण्णा आणि घरातील इतर मंडळी कोंडीबाविषयी बोलू लागली.''भाड्याला दुसरीकडं जायला नको चोरी करायला पायजे.'' त्यावर काकू म्हणाली ''नाहीतर आपल्याला, त्याला कायमचा दूर करायला हवा, आपल्या संभाला समदी जमीन-वाडा-पैका आडका समद मिळल.''

''आग, पण व्हय, समाजाला कसं फसवायचं ते तर ऐकून घे. तो तुरुंगातून सुटून आल्यावर आपण त्याला जेवणातून ईष घालून देऊ आणि सगळ्यांना सांगू की त्यानं चोरीच्या अपमानानं ईष खाल्ल कसं? हाइ कनाई आयडीया.'' आण्णा हळू आवाजात म्हणाला.

इकडे कोंडीबा आपल्याला अण्णा सोडवून नेईल याची वाट बघत बसला. दोन महिने झाले तरी कुनाचा पत्त्या नाई. कोंडीबाने अखेर ठरविले इथून पुढे आपन कुनाच्या वाटला जायच न्हाय. आण्णानं आपन चोरी केल्यामुळे खूप मारलं, बराबुर हाय त्याचा त्याला राग आला असल म्हणून तो आला नसल. आपन सुटून गेल्यावर आण्णाची माफी मागायची आणि सांगायच माझं लगीन कर, माझं मला रान दे मी दादसारखा सुखान संसार करीन. म्हातारपणी दादा वहिनीनं न्हाई सांभाळल तर मी सांभाळीन. अशा प्रकारे भोळ्या भाबड्या कोंडीबाची सुटका होते. आणि तो घरी येते.

त्यावर अण्णा त्याला म्हणाला, ''काय रं कोंड्या, कशी काय वाटली तुरुंगाची हवा? लई मजा आली असल ऐत खाऊन. काय रं पोलीसान जावाई करून घ्यायच तर ठरवल न्हाई ना तुला?'' कोंडीबास चिडवण्याचा प्रयत्न करीत अण्णा म्हणाला.

अशा प्रकारे घरातील सर्वजन त्याला अपमानीत करीत व्हते. अखेर ठरल्यापरमाणं आण्णाकाकूंनी त्याच्या जेवणात ईष घातले. त्याचे जेवन शेडकडं पाठविले. कामान थकल्यामुळे कोंडीबाने घाई-गडबडीने ते जेवण खाल्ल आणि क्षणातच त्याच शरीर गार पडल. काही वेळाने आण्णानं आरडाओरडा करून सगळं गांव गोळा केलं. खोट्या दयेच्या भावनेने तो म्हणू लागला.
''बघा की माझ्या कोंडीबानं अस काय खुळ्यागत केलं. माझ्या भावाचा तु लेकरू होतास मी तुला सांभाळला आणि अखेर तु असं केलस.....''

गाववाल्यांनाही ते पटले त्यांनी जास्त गोंधळ न करता कोंडीबाचे दहन केले.

★★★★

*फुले हे ईश्वराची कल्पना सोडल्यास इतर सर्व बाबतीत पूर्ण बुद्धिवादी दिसतात. त्याना कोणतीही धर्मसंस्था मान्य नाही. विवेकबुद्धी आणि बुद्धी यांचे अत्यंत पृथक अस्तित्त्व ते मान्य करीत नाहीत. पूजा, भक्ती, प्रार्थना, नामस्मरण, जप इत्यादी गोष्टींची त्यांच्या ईश्वराला गरज नाही एवढेच नव्हे तर मनुष्याने या गोष्टी करण्याची आवश्यकता नाही, त्या निष्फळ आहेत असे त्यांचे मत आहे. परलोक, पुनर्जन्म, स्वर्ग, मोक्ष, कर्मविपाक इत्यादी गोष्टी त्यांना मान्य नाहीत. याचा अर्थ असा दिसतो की, कोणत्याही प्रकारची धर्मसंस्था उत्पन्न होईल अशा तऱ्हेचा ईश्वर त्यांना मान्य नाही.*



# लोकगीतातील स्त्रियांचा भावनाविष्कार

कु.ललिता पाटील.
बी.ए.भाग - २

आज खेड्यात प्रगती झाली आहे. गिरण्या आल्या, जाती थांबली आणि खेड्यातील पहाटेची गाणी कमी ऐकू येऊ लागली. पण एक काळ असा होता खेड्यातील जीवन हे कष्टाचे होते. खेड्यातील स्त्रियांना दळण हे घरीच जात्यावर दळावे लागत असे त्यामुळे त्या स्त्रिया सकाळी भल्या पहाटे उठून जात्यावर दळायला बसत व त्या जात्याच्या बरोबर त्या गाणी म्हणत. गाणी म्हटल्यामुळे त्यांना आपले कष्ट कमी झाल्यासारखे वाटतात. जात्यावरील गाण्यातून त्यांनी आपल्या जीवनातील सर्व प्रकारच्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांची ही गाणी सहज भावनेतून उत्पन्न झालेली आहेत. गाणी त्यांच्याच भाषेतील बोलण्यातील आहेत. हया लोकगीतातून व्यक्त होणाऱ्या भावना सार्वत्रिक आहेत. महाराष्ट्रातील नव्हे तर जगाच्या परिस्थितीवरील कोणत्याही भावभावनांशी त्या मिळणाऱ्या - जुळणाऱ्या आहेत. म्हणून त्या भावना ज्या स्त्रीजीवनाविषयी व्यक्त होतात. हया भावना खऱ्याखुऱ्या आहेत. स्त्रीजीवन विविध प्रकारचे आहे, यामध्ये स्त्रियांचे कष्टमय जीवन, तिचे माहेराविषयीचे प्रेम, तिचा सवतीमत्सर, भावा विषयी प्रेम आणि तिच्या आशाआंकाक्षा यांचे चित्रण झाले आहे.

**कष्टमय जीवन जगणारी स्त्री–**

स्त्री ही सोशिक आहे. तिचे इतरांकडून शोषण होते. ती सर्व काही सहन करते. पण कधी कधी तिच्या सोशिकतेची मर्यादा संपते. तेव्हा ती गाण्यातून जीवनाविषयीचा तिरस्कार व्यक्त करताना दिसते. स्त्रीचे जीवन म्हणजे गुलामगिरी. हे आपल्याला नको असलेले जीवन आहे असे ती म्हणते.

''बाईचा हा जन्म नको घालु सख्या हरी रात्र ना दिवस परक्याची ताबेदारी'' स्त्रियांना खूप कामे करावी लागतात. म्हणून ती जीवनाला उकळत्या पाण्याची उपमा देते.

''आधणाच पाणी त्यात भात शिजवते.
रूसवे फुगवे त्यात सुख टिकवते''.

स्त्रियांना सासरी जावेच लागते. आणि सासर म्हटले की दु:खेच वाट्याला येणार त्यामुळे ती म्हणते.

"सासरच्या वाटे कुचुकुचु काटे" सासरचे जीवन कष्टमय वाटते म्हणून ती म्हणते.

''दुबळी मी देवा मले दुबळी राहू दे
लगनाचा जोडा सात जन्मी जाऊ दे''.

स्त्रीला आपला पती आपल्याला सोडून दूर जाऊ नये असे वाटते म्हणून ती आपल्या पतीला म्हणते.

''मुलूखगिरीले नको जाऊ र सजणा।
अस्तुरी दिलगीर तुम्हा करिते याचना।''

अशा प्रकारे तिला कष्टाने जगावे लागते. कधी कधी तर माहेरही दुखावते. शब्दाने माहेराची माणसे ही तिला दुखावतात.

''दागिन्याच लागत नाही मला
त्या सांग माझ्या वहिनीला
तिच्या शब्दांन जीव दुखविला
मी नाही येत लग्नाला.''

अशा प्रकारचे दु:खमय अनुभव घेऊन ही स्त्री कंटाळते आणि मरण्याची इच्छा करू लागते. तिच्या कष्टमय जीवनाचा विस्तार आकाशाएवढा होतो. स्त्री मोठ्या दु:खाने म्हणते.

''जिवाले झाले जड सांगु तरी कोणापाशी
शेवटचा घास मन फिरते आकाशी''

**स्त्रीचे माहेर विषयी प्रेम –**

स्त्रिला माहेरची ओढ ही मुळातच असते. तिचे सर्व लहानपण माहेरातच गेलेले असते. सासरची दु:खे

भोगल्यावर माहेरची आठवण येणे स्वाभाविक आहे. एक सासुरवाशीण म्हणते.

''माय तुझ्या घरी मीन काम नाही केलं
रांजणाच पाणी मले कोसावणी झालं''

म्हणूनच तिला आपल्या माहेराची आठवण मृत्यूच्या वेळी सुद्धा होते. तिला माहेरीच समाधान वाटते. ती पतीला सांगते.

''मले माहेरी समाधान वोऽसजनाजी''

भावाविषयीचे प्रेम हा देखील माहेराच्याच प्रेमाचा एक भाग आहे. आपल्याला भाऊ असलाच पाहिजे अशी इच्छा व्यक्त करणारी स्त्री म्हणते.

''बहिणीले भाऊ एक तरी वो असावा
थकल्या जिवाला एका रात्रीचा विसावा''

तिला आपल्या भावाविषयी प्रेम वाटते म्हणून ती म्हणते.

''दिवस बुडू गेला
झाडा झुडपांच्या गेला आड
मला बंधूच लई याड''

अशा प्रकारे भावावरील प्रेम ती अनेक शब्दातून व्यक्त करते. नंतर ती म्हणते की आपला भाऊ स्वाभिमानी आहे. परंतु तो आपली बहीण सुखी व्हावी म्हणून भाऊ सासरच्या माणसाचेही उणेदुणे बोलून घेतो तेव्हा ती म्हणते.

''पळस उगवला सारा डोंगर देतो शोभा
आपल्या बहिणासाठी बंधू लोकांच्या दारी उभा''

जेव्हा बहिणीला सासरहून माहेरी आणण्यासाठी म्हणून भाऊ बहिणीच्या सासरी जातो. व माहेरी पाठवाल का अशी विनंती करीत असतो. ही सासुरवाशीण माहेरी जाण्यासाठी आतुरलेली आहे. म्हणून ती आपल्या भावाचा वाट पहात आहे. ती म्हणते.

''सावली परतली माझ्या दारीच्या फणसाची
वाट मी बघ तो बपा माझीच्या गणेशाची''

ही स्त्री आपल्या आईच्या मुलाची म्हणजे भावाची वाट पहात आहे. ती आपल्या भावावरील प्रेम गाण्यातून सहज व्यक्त करते.

''सोजिच्या शेवायाला देता तुपाचा सडका
नटवा माझ्या बंधू बपांचा लाडका''

नंतर स्त्रीला वाटते की आपला भाऊ रुसून रागावून कोठेही जाऊ नये तेव्हा ती आपल्या भावाला विनंती करते.

''बहिणीच्या भावां परभारे जाऊ नको
दुबळी मी दादा नादारीले ब्याहू नको''.

अशा प्रकारे आपल्या भावावरील निष्ठा ती व्यक्त करते. समाजातील दुष्ट स्त्री लंपट माणसे त्याच्यावर वाकडी नजर ठेवतात तेव्हा ती म्हणते

''पापी लावे पाप मह्या धुतल्या साडीले
पडतीन किडे येच्या मरते कुडीले.''

ह्या बिचाऱ्या स्त्रिया त्यांना शिव्याशाप देण्यापलीकडे काय करू शकतात म्हणून ती म्हणते.

''लेक मी अश्शीलाची सूड वैऱ्याचा घेईन.
पांढऱ्याच्या लेकी आम्ही तलवारीच्या धारी''

त्यावेळेस ती त्याला आपल्या भावाची भीती दाखवते.

''पांढऱ्याच्या लेकी आम्ही तलवारीच्या धारी
लेक पांढऱ्याची बहिण बाजिंद्या भावाची ''

सासुरवाशीणीला आपल्या माहेराची साडी असावी अशी इच्छा असते. तेव्हा भाऊ तिला साडी घेतो. माहेरच्या प्रत्येक वस्तुवर तिचे प्रेम असते. साडी घेतल्यावर ती भावजयीच्या विषयी प्रेम व्यक्त करते.

आपल्या आईवरील माया ती आपल्या शब्दात व्यक्त करते.

''शेजीच उसनं
माझ्या उंबऱ्या वसल
बया माझीच उसनं
माझ्या जन्मांपासून''

अशा तऱ्हेने आपल्या आईचे आपल्यावर फार उपकार आहेत हे उपकार कधीही फेडता येणार नाही जसे आपण शेजारणीचे उसने आणले तर तिचे ते परत करतो. पण आईचे उपकार कधीही फेडता येत नाहीत. स्त्री म्हणते लेका पेक्षा लेक बरी.

''जोंधळ्या परास किती वाढतील तुरी
लेकापरास लेक प्यारी.''

ती म्हणते की गुजगोष्टी करण्यासाठी लेकच बरी ती सासरी येत असताना तिचे व तिचे आईचे हृदय भरुन येते तेव्हा ती म्हणते,

''सासरच्या जाती बाळ
दोन्ही चौकटी धरुनी
आल हृदय भरुनी''

तेव्हा ती मुलीला सासरी पाठविण्यासाठी ती शिवेपर्यंत येते म्हणून स्त्री म्हणते.

''सासर जाती बाळ
येसीर्ण्यंत आयाबाया
शिवे पर्यंत बाप बपा

तिथून पुढे मुराळी बंधुराया''

**स्त्रीची पतिभक्ती –**

स्त्री ही आपल्या पतीवर प्रेम करते, त्याचे गोडवे गाते, पतीची ती निष्ठा राखते, पती म्हणजे आपले सर्वस्व आहे असे तिला वाटते. पतीबरोबर ती सुखासमाधानाने राहते. तेव्हा ती म्हणते.

'भरताराच सुख तळहाताची सावली
नही आठू देल्ही परदेसची मावली'

अशी तिची पतिभक्ती आहे ही स्त्री प्रतिक्षेत किती एकनिष्ठपणे गुंतलेली आहे ती म्हणते

''कोन्हीकडे गेली मह्या कुंकवाची टिकली
कव्हा ते येईल वाट मंदिरी पाहीली''

आपल्या पतीची ती खूप काळजी करते. आपला पती आपल्याला जन्मोजन्मी लाभावा.

''देवा सूर्यनारायणा नीतनेमान ऊगवा
मह्या कपाळीस कुंकू साता जन्मात टिकवा''

असे तिचे पतीवरील प्रेम आहे आपल्याला पती मिळाल्याच भाग्य हे ती सासू सासऱ्याला देते.

सासू नि सासरा
माझ्या खजिन्याची पेटी,
हळद वेल कुंकु
केल जतान माझ्यासाठी

आपल्या सासूसासऱ्यानी आपल्या पतीचा सांभाळ जणू कांही आपल्यासाठी केला आहे असे तिला वाटते तिला स्वतःच्या दुबळेपणाची जाणीव आहे. म्हणून ती म्हणते.

''दुबळी मी देवा मले दुबळं राहु दे,
लग्नाचा जोडा साता जनमी जाऊ दे.''

आपल्या पतीच्या जीवनाशी ती एकरुप झालेली आहे.

मुलूखगिरीले नको जाऊ रे सजना
अस्तुरी दिलगीर तुम्हा करिते याचना

आपल्या पतीवर आपल्या मृत्यूनंतरही ती प्रेम करते ही विशेष बाब आहे.

''सांगते भरतारोले दुसरी करुन नांदजा,
आता सोडा मही अशा,
राणी कर जा दुसरी''

**स्त्रीचे मुलाविषयीचे प्रेम –**

स्त्रीला आपल्या मुलाविषयी फार प्रेम असते आपल्या मुलाला दृष्ट लागू नये असे वाटते म्हणून ती म्हणते.

''दृष्ट ग झाली म्हणू
मीठ मोहऱ्या मिरच्या तीन
अरे लाडक्या माझ्या बाळा
सया गलीला होत्या कोण''

ती आपल्या बाळाचे शाळेला जातो म्हणून कौतुक करते.

''शाळला जात बाळ, बाळ कुणाया राजाच,
लाडक बाळ माझ, नाव सांगतो आजोबाच''

तिला आपले बाळ आजोबाच नाव सांगतो म्हणून तिला आनंद होतो, ही स्त्री दुपारी कामे करीत घरी असते. तेव्हा कोणीतरी माळीण येते. तेव्हा ती म्हणते.

माळीन सादवती घ्या ग
बायानु सिताफळ
बाळ खाणार गेल शाळ

माळीन आल्यावर ती सांगते की खाणार बाळ शाळेला गेल आहे म्हणून सीताफळ घेत नाही.

**परमेश्वरावरील भक्ती –**

ही स्त्री जात्याच्या गाण्यामधून परमेश्वराला सुद्धा आळविण्याचा प्रयत्न करते. त्यातूनही ती परमेश्वराचे चिंतन करते.

नवास मी बी केल स्थळ पंढरीच्या देवा
माझ्या बंधुला ल्योक व्हावा
भला मुराळी मला यावा
माहेरच्या देवा, नाही तुला मी इसरत
वेल जावू दे पसरत

अशा तऱ्हेने ती आपल्या इच्छा देवाकडून पूर्ण करुन घेते. ती म्हणते,

''सरल दळल सरली आरती सेनापती
पांडुरंगाची रुक्मिणी दळणं दळून मला जाती''

तिला या गाण्यामुळे आपले दळण केव्हांच दळून झाले हे समजत सुद्धा नाही म्हणून ती म्हणते. मला रुक्मिणी दळू लागून गेली. शेवटी ती म्हणते की

''सरल दळलं सरलं म्हणू नही
सासर माहेर नांदत दोन्ही सखे''

शेवटी ही स्त्री सासर व माहेर यांना समानच मानते. अशा तऱ्हेने स्त्रीच्या या जात्यावरील उत्स्फूर्तपणे गाण्यात सर्व भावना उघड केल्या आहेत.

★ ★ ★ ★



# कर्मयोगी कर्मवीर

कु.वैशाली वि. पाटील.
११वी सायन्स्



'कर्मवीर''कर्मयोगी' रयत शिक्षण संस्थेचे थोर संस्थापक, कथनी करनी एक करो, या उक्तीचे पुरस्कर्ते भाऊराव पायगोंडा पाटील यांचेविषयी मी लिहिणे म्हणजे मेणबत्तीच्या प्रकाशात सूर्याचे दर्शन घेण्यासारखे आहे.

कर्मवीर या शब्दातच किती मोठा अर्थ लपलेला आहे. कर्मवीर म्हणजे सतत कष्ट करत रहायचं आणि आपण केलेल्या कष्टावर निष्ठा ठेवायची हाच याचा अर्थ. कैक वर्षे बंद झालेले शिक्षणाचे दरवाजे उघडण्यासाठी आणि महाराष्ट्रातील बहुजन समाजाला अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी एका तेजस्वी ताऱ्याने म्हणजेच कर्मवीर आण्णांनी सन २२ सप्टेंबर १८८७ रोजी कुंभोज या गावी एका जैन शेतकरी घराण्यात जन्म घेतला.

"Education through self help is our motto."हा मंत्र देणाऱ्या कर्मवीरांचा पिंड छत्रपती शाहू महाराजांच्या तालमीत तयार झाला. कोल्हापूरला राजाराम हायस्कूलमध्ये शिकायला असताना एकदा भाऊराव आई-वडिलांना भेटण्यासाठी इस्लामपूरला गेले असता त्यानी पाहिले की एक मुलगा शाळेच्या व्हरांड्यात बसून अगदी आत्मियतेने ज्ञानामृत पीत आहे. भाऊरावांनी 'बाळ, तू इथे का बसला आहेस?' असा प्रश्न केला तेंव्हा त्या मुलाने 'मी रोज इथेच बसून ज्ञान घेत असतो'. असे हृदयभेदक प्रश्नाचे उत्तर दिले. संत ज्ञानेश्वरांच्या महाराष्ट्रात ज्ञानदेव घोलप नावाचा दलित मुलगा ज्ञानाला पारखा झालेला पाहून आण्णांना कळवळा आला व समाजाबद्दल एक विलक्षण चीडही निर्माण झाली. त्यानी त्याला कोल्हापूरला आणून त्याच्या ज्ञानाला पोषक वातावरण निर्माण केले. हाच ज्ञानदेव पुढे एल.एल.बी. झाला व शेवटी मुंबई विधान परिषदेचा सभासद बनला.

भाऊराव स्वभावत:च बंडखोर वृत्तीचे होते. एका सार्वजनिक विहिरीवर पाण्यासाठी उन्हामध्ये अस्पृश्य बायामाणसे उभी होती. त्यांच्या अंगाचे पाणी पाणी होत होते. पण स्पृश्य लोक त्याना पाणी भरून देत नव्हते. आण्णा तावातावाने तेथे गेले आणि रहाटच मोडून विहीरीमध्ये टाकला. अस्पृश्यांना पाणी भरण्यास सांगितले. ज्याप्रमाणे अपंग मुलावर आईची माया असते तशी अस्पृश्य समाजावर आण्णांची अधिक माया होती. 'एक गाव एक पाणवठा' अशी घोषणा आज स्वातंत्र्य काळात आपण देतो पण त्याची कृतीयुक्त सुरुवात आण्णानीच केली. यावरून ते बोलके समाजसुधारक नव्हते तर कर्ते समाजसुधारक होते हे दिसून येते.

आण्णा जरी खूप शिकले नसले तरी त्याना शिक्षणाचे महत्व समजले होते. खेडोपाड्यातील कर्जामध्ये बुडालेल्या व सावकाररूपी गिधाडांच्या तावडीत सापडलेल्या व पाण्यातून काढलेल्या एखाद्या माशाप्रमाणे अवस्था झालेल्या शेतकऱ्याचे अतिशय बारकाईने निरीक्षण करूनच आण्णानी शिक्षण संस्था स्थापन करण्याचा विचार केला.

आम - जनतेला, सर्वसामान्यांना शिक्षणाचे दरवाजे उघडून देण्यासांठी कर्मवीरांनी १९१९ साली सातारा जिल्ह्यातील काले येथे रयत शिक्षण सहस्थेचे पहिले वसतिगृह स्थापन केले. नंतर वाळवा तालुक्यातील

नेर्ले येथे दुसरे वसतिगृह सुरु केले.

अशा प्रकारे आण्णांनी ३२९ माध्यमिक शाळा, ८० वसतिगृहे, ९ प्रशिक्षण महाविद्यालये व ५७८ शाळांची स्थापना केली. त्यातून उच्च - नीचतेचे जातीय व धार्मिक अहंकाराचे तण उन्मळून पडले. ते व्यवहारी विचारवंत कृतीवीर होते. त्या संस्था उभारण्यासाठी ते झोपडी - झोपडीत ग्रामीण जनांच्या वस्त्यांमध्ये अनवाणी हिंडले. कोरड्यास - भाकर शिळीपाकी असली तरी ती खाऊन तेथील लोकाना मुले शाळेत पाठवण्यास प्रवृत्त केले.

वसतिगृहासाठी, शाळांसाठी धान्यधुन्य, अवजारे दगडमाती, इत्यादी उपलब्ध होणारे साहित्य जमवले. हा निस्वार्थी, धाडसी, ध्येयवादी नेता आपणासाठी झटतो याची जाण जनमानसात येताच लाखो रूपयांचा पाऊस पडला. आपल्यातील निस्वार्थी, शेतकरी - कामकरी, कष्टकरी नेता बहुजन समाजाच्या हितासाठी कणाकणाने झिजून पायी अनवाणी हिंडून विद्यार्थीगण मिळवतो. या श्रेष्ठ कामाला हातभार लावणे आपले कर्तव्य मानून तळागाळातील लोकांनी संस्थेच्या इमारती सुसज्ज करण्यास स्वयंप्रेरणेने भरघोस आर्थिक सहाय्य केले.

भाऊराव थोर समाजसुधारक होते. ग्रामीण शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. खेड्यातील लोकांना नवसंजीवन देणारे देवदूत होते. टिळक - आगरकर व चिपळूणकर यानी इंग्रजी शाळा महाविद्यालये काढली पण ज्याना अजून प्राथमिक शिक्षण मिळाले नसेल ते हे इंग्रजी ज्ञान, वाघिणीचे दूध कसे पचवणार? आणि म्हणूनच आण्णानी प्राथमिक शाळा स्थापन करून वाघिणीचे दूध समजले जाणाऱ्या इंग्रजी भाषेला शेळीच्या दुधाइतके स्वस्त करून टाकले. आम्हीही शिकू शकतो, वाघिणीच दूध पचवू शकतो, असा ठाम व जबरदस्त विश्वास आण्णानी जनतेमध्ये रूजवला.

वसतिगृहात कर्मवीरानी जी मुले आणली होती त्याना स्वत:ची कामे स्वत: करायला लावीत 'श्रमवान लभते ज्ञानम्' वा 'जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला' अशी त्यांची धारणा होती. स्वावलंबन, स्वाभिमान, स्वातंत्र्य, स्वाध्याय ही त्यांच्या जीवनाची चतु:सूत्री होती. गरीब पण हुशार विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे शिक्षण देणे हा त्यांचा मूलमंत्र होता. शारदा माता होत्या म्हणून रामकृष्ण परमहंस सद्‌गुरु बनले तद्‌वतच आण्णांच्या अर्धांगिनी लक्ष्मीबाई ही महान प्रेरक शक्ती त्यांच्या पाठी उभी होती. म्हणून कर्मवीर आपणास दीपस्तंभ लाभले.

आर्थिक दास्य, धार्मिक गुलामगिरी, मानसिक अपंगत्व, जातीय विकृती या समाजामध्ये प्रवेश करू पहाणाऱ्या विषाला कायमचा निरोप देण्यासाठी त्यावर रामबाण औषध म्हणून आण्णानी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आण्णांचा बाणेदारपणा वाखाणण्यासारखा होता. सुरुवातीस छत्रपती शाहू कॉलेज आर्थिक संकटात सापडले असता खानदेशातील एका उद्योगपतीने त्यांना कळविले,'या कॉलेजला माझे नाव देत असाल तर मी तुम्हाला एक लाख रु.देणगी देईन!'उलटपत्री आण्णांनी काय उत्तर दिले पहा,''एकवेळ, मी माझ्या जन्मदात्या बापाचे नाव बदलीन पण छत्रपती शाहू महाराजांचे नाव कदापिही बदलणार नाही, कदापिही बदलणार नाही.'' वा! केवढी मोठी ही ध्येयनिष्ठा! आण्णांनी नामवंत व शीलवंत माणसं पेरली. ती जमिनीमध्ये रुजली, उगवली आणि आजही समाजाला शीतल छाया देत खंबीरपणे निर्धाराने उभी आहेत.

अन्यायाची चीड, न्यायाची चाड, काळ्या आईशी, भूमातेशी इमान, सामाजिक बांधिलकीची जाण, मोडेल पण वाकणार नाही, या गुणांचा संगम 'Sound mind in a sound body'अशी शरीरयष्ठी असणाऱ्या कर्मवीरांच्या अंगी झालेला होता. त्यांचे म. गांधींवर खूप प्रेम होते व गांधीजींचे सुद्धा त्यांच्या रयत शिक्षण संस्थेवर अलोट प्रेम होते. कर्मवीरांच्या बद्दल बोलत असताना ते म्हणतात की, 'कर्मवीर भाऊराव पाटील की सेवाही उनका सच्चा कीर्तिस्तंभ है।' राजा हरिश्चंद्राने सत्यासाठी आणि सत्वासाठी स्वत:चाही त्याग केला. याच सत्याच्या आणि सत्वाच्या

आधारे महात्मा गांधीजी देशाला स्वातंत्र्य देऊ शकले व याच्याच आधारे कर्मवीर आपण स्वत:करिता जगावयाचे नाही तर इतरांसाठी जगावयाचे हा शाहू महाराजांचा मूलमंत्र पूर्ण करु शकले.

आण्णांच्या महान कार्याने प्रेरित होऊन जनतेने त्याना 'कर्मवीर' ही पदवी दिली. भारत सरकारने पद्मभूषण आणि पुणे विद्यापीठाने डी.लीट्. म्हणजे डॉक्टर ऑफ लेटर्स महान किताब देऊन त्यांचा गौरव केला.

असा हा रयत शिक्षण संस्थेचा थोर संस्थापक, निर्माता ९ मे १९५९ रोजी काळाच्या पडद्याआड विलीन झाला. त्यांच्याच वसतिगृहातील एका माजी विद्यार्थ्याच्या शब्दात -

**''या चार भिंतीवर विलसे दिव्य समाधी,**
**हा रयतपूरीचा राज्यघाट हो त्यागी।**
**ही मूर्ती देवो स्फूर्ती सतत विरागी,**
**स्वर्गस्थ सुरांची पुष्पवृष्टी दिनरात।**
**तो अमर जाहला कर्मवीर जगतात**
**तो अमर जाहला कर्मवीर जगतात॥**

★★★★

## थोरांचे बोल

देशातलं दारिद्र्य पाहून माझं अंत:करण नुसतं व्यथित होतं, परंतु ऐदी, आळशी नालायकांच्या संपत्तींचे प्रदर्शन पाहिलं, की माझ्या अंतकरणाच्या चिंध्या चिंध्या होतात.

**महात्मा गांधी**

## ● आपले महाभारत ●

*जीवन प्रवाह सतत् पुढे सरकत असतो म्हणूनच त्या जीवनाला जिवंतपणा असतो. जीवनाने प्रवाहित होण्याचे नाकारले तर जीवन जिवंत राहत नाही. ते नासते. स्वत: नष्ट होते. व दुसऱ्यालाही नष्ट करते. कुठे रूंद तर कुठे अरूंद, कुठे खोल, कुठे उथळ, कुठे खळखळाट तर कुठे संथ अशा भिन्न प्रकाराने सरितेचे वर्णन केले तरी तिच्या जीवनाला भिन्नता असत नाही, त्याचप्रमाणे नीतीनियमाचे असते. आचार धर्म बदलला तरी मूळ विचाराला धक्का लागत नाही. हेच समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे.*

***संग्रहण : कु. वंदना विलास जाधव / १२ वी कला***

*गड्यानों, पतंजलीच्या भाष्यात, म्हणे असे एक वाक्य आहे, की ''एक: शब्द: सम्यक ज्ञात: स्वर्गे लोके कामधुभवति।'' एकच शब्द; परंतु जर त्याचे नीट ज्ञान झाले असेल, तर मनुष्याला मोक्ष मिळतो. ''सम्यक ज्ञात:'' नीट समजलेला; वाचलेला नव्हे, घोकलेला नव्हे, तर समजलेला. जे खरोखर समजले, ते आपण अनुभवात आणतो, आचरणात आणतो. लहान मूल कंदिलाला धरू पाहते, कंदिलाची काच तापलेली असते. आई लेकराला दूर करते. पुन्हा ते कंदिलाजवळ जाते. शेवटी आई म्हणते, ''लाव - लाव हात।'' ते लहान मूल हात लावते. हाताला चटका बसतो. पुन्हा ते मूल काच धरीत नाही. ते ज्ञान पक्के झाले. सॉक्रेटिस म्हणूनच ज्ञानाला सद्गुण म्हणतो. संस्कृतमध्येही परमज्ञानाला अनुभूती हा शब्द लावतात. अनुभूती म्हणजे अनुभव जे जीवनात अनुभवितो, तेच ज्ञान.*

**साने गुरूजी**

ooooooooooooooooooooooooo

# जिद्द

कु.कमल दशरथ तोडकर

११वी आर्टस् ब

ध्याडभर रखरखत्या उनात हिंडताना सुख्या आता मावळतीकड कलला व्हता. चराय गेलेली गुरं आन साळंची पोर घरला परतत व्हती. जंगलात लाकडं तोडाया गेल्याली शांती बी ह्याच येळंला घराला परतत व्हती. डोईवरच्या लाकडाच्या बिंड्यावर वज्यांन ती कंबरत जणु वाकलीच गेली व्हती. पायात चेपल्या बी नव्हत्या बिचारीच्या. काट्याकुट्याचं बी भ्या नव्हतं तिला. तरातरा चालत ती फुडं चालली व्हती. ती भयान जंगलातं धड़ान आसली तरी बी तिचं मन घराकडं ओढ घेत व्हतं. घरात तिचा येकुलता येक पोरगा व्हता. चारापानी आनाया गेल्याल्या चिमणीगत तिची अवस्ता झाली व्हती. शांतीचा तिच्या पोरावर भारी जीव व्हता. काट्याकुट्यातनं चालतान शांतीच्या मनात तिच्या लाड़क्या पोराचा म्हंजी गण्यांचाच इचार चालला व्हता. गण्यानं शिकून लई मोटं व्हावं आसच शांतीला वाटत व्हतं. गण्या शिकून मोटा व्हईल आन् बक्कळ पैकं मिळविल. आन् मग तवा त्यो मला आपल्या घरात एकाद्या म्हारानीगत बसवून ठेवल. गण्यां चार चाकी गाडीतनं फिरल आन् मला बी न्हिल कवा कवा. ह्यो सगळा इचार करत करत शांती घरात येऊन पोचली!

बगतीया तर दार सताड उघड घरामंदी तर कुनी बी न्हवतं म्हनून ती हाका मारू लागली 'गण्यां आरं ए गण्यां'. कुठं गेलाय् मेला कुनाला म्हाईत आरं.... तुला घरची काळजी हाय का नाय? मी मर-मर मरून चार पैकं जमिवतीया आन् ते बी कुनी चोरलं-बिरलं तर उद्या खाशील काय रं? पोटात काय दगडं भरतोस व्हयं? सांळची फी कशानं दिशील रं? गण्याला हुडकत -हुडकत शांतीच्या तोंडाचा पट्टा चालूच होता. पर तरी बी गण्या दबक्या पावलानं घराला आला न्हवता. तवा मातूर तिचं काळीज चर्रर्र झालं. तिच्या तोंडाचा पट्टा लाईन गेल्यागतं बंद पडला. तिचं डोळं गण्याला हुडकू लागलं. ती परत्येकाच्या घरी गण्याची चौकशी करू लागली. गरीब दलितांची वस्ती सोडून ती फुड झाली. तर गण्या रस्त्यावरच्या खांबावर असलेल्या दिव्याखाली पुस्तक वाचीत व्हता. गण्या नदरं पडताच धावत जाऊन तिन गण्याला कुरवाळलं. तिला बगून गण्यां बी ओक्साबोक्शी रडू लागला आन् मागनं इरमला कंदीबी न रडत्याला गण्या आता रडतुया हे बगुन शांती बी बावरलीच. जनु, तिनं गण्याला इचारलं, ''कारं गण्या? का रडतुयास? घंरात दिवा पिटवून पुस्ताक वाचायाच न्हाय व्हयं रं? ''तवा गण्यां म्हणाला,'' न्हाय ग माय, घरातलं घासलेट संपलया आन् आभ्यास न्हायला तर गुरुजी मारत्याल. आन् ती शिरमंताची पोर मला हासत्याल. मला कुनी हासल्यालं न्हाय आवडत ग माय! न्हाय आवडत. ती पोर मन्त्यात ह्यो काय शाळा शिकतूया. जेवायला आन तर मिळतया कांर तुला? जा! जाऊन मजुरी कर आन् आईला मदत कर आस मनून मला हॅ ऽ हॅ ऽ करून हसत्याती. आता तूच सांग माय, मी गरीब आसलो तर त्यो काय माजा गुन्हा वय ग? पर न्हांय मी शिकून लय मोटा व्हणार. ते बी शिरमंताच्या पोरांच्या नाकावर टिच्चून!''

शांतीला गहिवरून आलं ती म्हणाली ''व्हय रं माझ्या पोरा व्हय, तू शिकून मोटा व्हावस आसच मला बी वाटतया ''. गण्याला समजावित समजावित ती घरी येऊन पोचली. ती रात्र अंधारातच घालीवली. दुसऱ्या दिवशी तिनं घासलेट आनून ठेवलं.

आसं करत करत गण्या एम. ए. झाला आन्

आज त्यो समाजशास्त्राचा प्राध्यापक आहे. प्रा. गणेश धोडींबा कांबळे गण्या प्राध्यापक झाला आन् शांतीच्या कष्टाचं चीज झालं. आता गणेश कांबळेची त्याच्याच गावामंदी नऊ एकर केळीची बाग हाय. त्यो आता मोटा शिरमंत माणूसच बनलाय जनू आता परत्येकजन तेची वाहवा करतो. तेच्या परत्येक शब्दाला लय मोटी किंमत आलीया. पर याच गणेश कांबळेला अगोदर कुनी बाजूला हुभा बी करून घेत न्हवता पर आता तेच्या नशीबाचा कवडसा बदलला आन् ह्यो कवडसा उगा न्हाई बदलला आवं तेन कष्ट करून, खस्ता खाऊन, मजूरी करून, कधी उपास-तापास काढून तर कधी चिंध्या-चिंध्या झाल्याली कापडं घालून त्या बिचाऱ्यानं दिवस काढलं आन् म्हणूनच आज त्येला हे दिवस बघाया मिळालं. त्येन जर कष्ट केलं नसतं खस्ता खाल्या नसत्या तर हे सारं झालंच नसतं.

एवढंच नव्हं तर गणेशनं आपल्या जीवनातनं धडा घेतला आन् कमीत कमी एका तरी गरीब मुलाला सवताच्या खर्चानं शिकवून मोटा माणूस बनवायचं आस त्यान ठरीवलं आन् त्यान हे खरं केलं. आज रामू माळ्याचा अनाथ पोरगा त्याच्या जवळ शिकतूया आज त्यो दहावीच्या वर्गात हाय. कुणाला ठाऊक उद्या त्यो बी गणेश कांबळे सरांच्या सारखा मोटा मानूस व्हईल आन् आपल्याला संभाळून आकार देणाऱ्या सरांचा अगदी चांगल्या प्रकारचा वारसा चालू ठेवलं.

★★★★

## 'माझी खंत'

वाटत होते माझा गाव किती महान।
जिल्ह्यात येथले पुढारी झळकत होते छान।
या पुढाऱ्यांची बाहेरची महान कृत्ये पाहुन।
वाटलं, माझ्या भूमीने किती दिलीत रत्न छान।
पण येथे येऊन पाहते तो काय
गाव अज्ञानाच्या अंध:कारात वावरत होता छान।
आणि याच अज्ञानात इथले पुढारी
पुढारीपण टिकवून होत होते महान।
गाव नीतीमत्तेला तिलाजंली देऊन।
वावरत होता छान।
आणि या स्वैराचारात भर टाकुन।
इथले पुढारी होन होते महान।
चोरी, लांडी, लबाडी तुपाच्या वासाने खरकट खाणाऱ्यांची
येथे संख्या वाढली होती छान।
आणि यालाच खतपाणी घालुन
इथले पुढारी होत होते महान।
गावातील तरुण पिढीही।
याच चाकोऱ्यातून वाटचाल करत होती छान।
आणि तरुणांच्या विकृत वृत्तीला चालना देऊन
इथले पुढारी खुर्चीची बळकटी करून।
होत होते महान।
इथल्या स्त्रीजातीला रस्त्यावरून
बेधडक चालता येत नव्हत।
कारण नातंगोतं विसरून
वासनेसाठी वखवखलेल्या नजरा
त्यांच्यावर स्थिर होत होत्या।
तेव्हा या आगीतून स्वत:चे शील
त्याना पवित्र राखणे मुश्कील होत होते।
आणि इथले पुढारी तरुणांच्या
· घाणेरड्या वृत्तीला चालना देऊन
"जीवनाचा असाच आनंद घ्यायचा असतो"
असे तरुण पिढीवर संस्कार करून
होत होते महान।
स्वाभिमान विनम्रता यानी
जोपासली नव्हती कोठे।
फक्त आडदांडपणा
जागृत होता येथे।
आणि इथल्या पुढाऱ्यांनी।
समाज स्वास्थ्याच्या विरोधात
असलेल्या या वृत्तीचा फायदा
उठवला होता छान।
आणि दबाव टाकून होत होते महान।
आपुलकी, आदर, उदारता, माणुसकी
यासारख्या उदात्त भावना येथे दिसत नव्हत्या।
फक्त सुसंस्कृत नीतीमत्तेला जाळून
कस जगायचं एवढच याना माहीत होतं।
म्हणूनच असा हा गाव माझा म्हणायला
मला वाटत होती लाज, वाटत होती खंत।

**कु. वत्सला पाटील** / १२ वी कला

# काळ



कु.अर्चना कैलास रायनाडे
११ वी आर्टस् - ब

दाट काळोख पडला होता. सभोवती जंगल पसरलं व्हंत. पाऊलवाट क्षितिजाला छेदून पार पलीकडं गेल्यागत दिसत व्हती. या लांबच्या लांब वाटेवरुन वाट हुडकत-हुडकत मुकूंदा चालत व्हता. पायात जोडं नव्हतं. तसाच आणवाणी पायानं मैलोमैल रस्ता कापून आला व्हता तो, अन पुढ बी चालायचं व्हतं. रात्रंदिवस चालून त्याच पाय सोलून निघालं व्हत. पायातून रगत येत व्हत तरी बी तो चाललाच व्हता.

जंगल पार पाडून त्यानं एक रान गाठलं. काळोख दाटल्यानं त्याला पुढचा रस्ता गावना. म्हणून रात्रभर विसावा घेण्यासाठी जागा शोधू लागला. दोन - चार पावलं फुढं गेल्यावर त्याला थोडा कंदीलाचा उजेड दिसला. तसा तो झपाझप पावलं टाकत त्या दिशेनं चालला. तिथं एक झोपडी व्हती.

मुकुंदानं झोपडीच्या दरवाज्याची कडी वाजिवली. तोच आतून आवाज आला,

'कोण हाय?'

'मी हाय! मुकुंदा.'

दार न उघडताच आतल्या बाईनं परत प्रश्न विचारला,

'मुकुंदा ! कोन रं तु?.'

प्रश्न ऐकून मुकुंदा म्हणला, 'आजी, दार तर उघड! मग सांगतुया, मी कोण हाय ते!'

असं म्हणताच आजीनं दार उघडलं अन् डोळं बारिक करुन ती निरकून मुकूंदाला बघू लागली. वळक पटना म्हणून तिन विचारलं,

'कोन हाईस रं तु? म्या तुला अजुन वळीकलं न्हाय.!

मग मुकूंदा म्हणाला,

'अग आज्ये तू मला वळकीत न्हाईस अन् म्या बी तुला वळकीत न्हाय. मी वाटसरु हाय. तुझ्या झोपडीत उजेड दिसला म्हून विसाव्याला आलुया.'

'असं व्हय, मला काय ठावं! बरं थकला असशील, बस थोडावेळ मी गरम भाकर करुन देतो तुला.

मुकुंदा म्हणाला, 'नग आज्ये, भाकर नग मला, भूक न्हाव बघ. चालून - चालून कंट्टाळा आलाया झोपतो थोडायेळ.'

मुकुंदानं नग म्हटलं असताना बी आजी भाकर करु लागली. अन् भाकर करता-करता त्याची विचार-पूस करायला लागली. ती म्हणाली, 'काय रं! कुणाला हुडकाया निघालास? कुठून आलास? कुठं चाल्लास?'

आज्जीचे एकदम एवढे प्रश्न ऐकून मुकूंदा म्हणाला, 'सांगतो म्या सगळं. जरा दमानं विचार की. मी माझ्या भनीला पोरगा झालाया पर लई आजारी पडलीया असा सांगावा आलाया तिच्या सासरकडनं म्हणून शान म्या चालूया तिला बघाया' असं सांगताच आजी म्हणाली 'काय रं नाव तिचं?'

'लक्ष्मी! लक्ष्मी नाव हाया तिचं'

'कोण लक्ष्मी? ती पाटलाची सून तर नव्हं!'

तसा लगबगीनं मुकूंदा म्हणाला, 'व्हयं, व्हयं तीच.तुला कसं ठावं?'

'अरं, गावचा पाटील हाया त्यो, कोण न्हाय वळीकणार त्याला?' असं म्हणत तिनं थोडी भाकरी व भाजी मुकूंदाला आणून दिली. नग, नग म्हणत मुकूंदा खाऊ लागला. खाता-खाता त्यानं आजीला इचारल. 'काय गं आजे! एकटीच हायीस? कोण हाय का न्हाय तुला?'

'एक मुलगा हाया. तो शेरात राहतुया अन् पैसं पाठिवतोय. त्याच्यावरच जीवंत हाय बघं.' असं म्हणत आजीनं आपलं अंग अंथरुणावर टाकलं. मुकुंदाचं पण जेवण संपल व्हत. तो बी झोपला.

इकडं त्याची भन अंथरुणात खिळून व्हती.

आपला भाऊ आत्ता यील, मग यील म्हणून ती जीव डोळ्यात आणून त्याची वाट बघत व्हती. तिला बी माहीत व्हतं की आपलं आता मरण जवळ आलया म्हणून ती आपल्या बाळाकडं बघतं व्हती. डोळं भरुन बाळाला बघत व्हती अन् नि:श्वास सोडत व्हती.

सकाळी-सकाळी पक्षांच्या आवाजानं मुकूंदाला जाग आली. अन् त्याला वाटत की आपल्या भनीनं आपल्याला हाक मारली म्हणून ताडकन् तो उठला. बाहेर जावून बघतो तर सूर्य डोंगराच्या वर आला होता. आजीला त्यानं उठिवलं व तिचा निरोप घेऊन परत आपल्या वाटला लागला.

एक-दोन मैलावरच त्याच्या भनीचं गाव व्हतं. गाव जवळ येताच त्यानं आपल्या चालण्याचा वेग वाढिवला अन् घर नजीक येताच तो भनीच्या ओढीनं पळतच सुटला. दारात जाऊन पोहचताच त्याला दिसलं की, सगळं शांत झालया. थोडे गावकरी दारात उभी हायीत हे बघून त्याच्या मनात पाल चुकचुकली. आत जाऊन बघतो तर काय ! त्याचा संशय खरा ठरला व्हता. भनीच शरीर पलंगावर पडल व्हतं. तिच्या डोक्याजवळ तिचा नवरा रडत उभा व्हता. इकडं सासू धाय मोकलून रडत व्हती, सासरा डोळं पुसत लहानग्या जीवाला घेवून उभा व्हता. हे सर्व बघून त्याच मन अगदी भरुन आल. गहिवरच्या मनाने त्याने आपुल्या भनीकड धाव घिटली. भनीच्या पायाजवळ बसून मुकूंदा मोठ्यानं रडू लागला. भनीच्या सगळ्या आठवणी त्याच्या डोळ्याम्होरं क्षणातच येऊन गेल्या. काय बोलावं ते त्याला समजना. भनीला हालवत मुकूंदा हुंदके भरत बोलू लागला, 'ताई! ये ताई उठ की गं. बघ, बघ म्या आलोया मुकूंदा! तुझा भाऊ. माझी जरा बी वाट बघायची न्हाय व्हय. न भेटताच कशी गं तू गेलीस? लग्नानंतर तुला बघतोय ते अत्ताच. ते बी या अवस्थेत' असे म्हणून मुकूंदा जास्तच रडू लागला.

मुकुंदाला सावरत लक्ष्मीचा नवरा त्याला म्हणाला, 'गप्पं बसं, रडल्यामुळं गेलंलं माणूस परत येत न्हाय! मनाला धीर दे.' त्याचे शब्द संपायच्या आधीच सासू ताडकन उठली अन् बाळाला घेऊन तो इवलासा जीव त्याच्याकडे सोपवला व ती म्हणाली, घेवून जा या कार्ट्याला. घरात पाय ठेवायच्या आगुदरच यानं आईला खाल्लं, उदया बापाला अन् परवा. न्हाय न्हाय असं होता कामा न्हाय. आमचा पुरा वंश गिळून जाईल हा पांढऱ्या पायाचा. जा चालता हो इथनं. असं म्हणत तिनं मुकूंदाला घराबाहेर काढले. सर्वजण तिची समजूत घालत व्हते. पण कुणाचा एक शब्द ऐकायला ती तयार नव्हती.

आल्या पावली मुकूंदा परत फिरला. जाताना मुकूंदाला लक्ष्मीच्या नवऱ्याने रोकले. खाली मान घालून त्याने मुकूंदाकडे माफी मागितली. तो मुकूंदाला म्हणाला, 'मुकूंदा हे बघ, तुझी भन जाताना तुला लई आठवण करत व्हती. पर तुला यायला पार उशीर झाला. जाता जाता ती मला सांगून गेलीया की ह्या पोराला लई-लई शिकवून डाक्टर करा म्हूण. पर ते भाग्य माझ्या नशीबी नाही. ह्या घरात राह्याच म्हंजी घरातल्यांच ऐकाया हवं. म्हणूनशान मी बी गप्प बसलूया बघ तुला झालं तर तुझ्या भनीची इच्छा पुरी कर.' असं म्हणून तो गप्प बसला. मुकूंदानं त्याचा निरोप घेतला अन् आपल्या घराकड जाया निघाला.

घर जवळ आल व्हतं. मुकूंदाची आय दारात त्याची वाट बघत बसली व्हती. मुकूंदा व त्याच्या हातात पोर दिसताच तिनं मुकूंदाच्या बापाला बाहीर बोलीवलं. तिला वाटलं लक्ष्मी बी आली असंल. पर मुकूंदा जवळ आला तरी बी अजून ती का दिसना म्हणून तिनं मुकूंदाला विचारलं, 'का रं! यकलाच आलास व्हय, बाळाला घेवून. लक्ष्मी कुठं हाया?' आईचं ह्ये बोलन ऐकून मुकूंदाच्या डोळ्यात पाणी आलं. डोळं पुशीत म्हणाला, 'आयं, आपुली ताय आता न्हाय राहली गं,' हे ऐकताच आईनं हंबरडा फोडला अन् छाती बडवून घेऊ लागली. डोसक आपटू लागली. मुकूंदाच्या बापाला बी रडं आलतं पर घरात थोरलं माणूस, ते आपलं पाणी कुणाला दावणार म्हून त्यानं मुकूंदाच्या आईला सावरायचा परयत्न केला.

घडलेली सारी हकीकत मुकूंदानं सांगितली. झालं गेलं सारं इसरून लक्ष्मीच्या पोराला मोठं करायच त्यांनी ठरिवलं. त्यांच्या घराण्यात कुणी जास्त शिकल्याल नव्हत. मुकूंदा सहावीपतर शिकल्याला व्हता. म्हणून लक्ष्मीची इच्छा पुरी करायची त्यांनी ठरविली.

लक्ष्मीच्या मुलाचं नाव त्यांनी प्रसाद ठेवलं व्हतं. लाडानं त्याला मोठं केलं व्हतं. प्रसाद पाच वर्षाचा झाला व्हता. बराच हुषार अन् धाडसी व्हता तो. मुकूंदान त्याला गावातल्या शाळतं घातलं. प्रसाद चांगलं मन लावून अभ्यास करत व्हता. गावातल्या शाळतच

त्यान १० वी केली. त्याला ८६.५% इतक मारक पडलं. घरातल्या सगळ्यांना आनंद झाला व्हता. मुकूंदाला बी लई आनंद झाला व्हता. कारण त्याला डाक्टर करायचं व्हत नां! कोल्हापुरात मुकूंदाचा मामा राहत व्हता. मामाच्या घरी ठिवून त्याला शिकवायचं अस् त्यानं ठरीवलं.

एकदिवस प्रसादाला घेऊन तो कोल्हापुरला आला अन् त्यानं मामाच्या हवाली प्रसादाला सोपीवलं. अन् प्रसादाच कॉलिज मंदी नाव घातलं. मुकूंदाचा मामा लई चांगला व्हता पर मामी! ती लई वाईट व्हती. प्रसादकडून सारं करून घियाची पर जेवायला थोडच घालायची. प्रसादनं कधी बी तिला वाईट बोलंल न्हाय. त्याला बी शिकायचं व्हत म्हणूनशान तो गप्प व्हता. काम असून बी अभ्यास करायचा.

डाक्टर व्हायसाठी ज्या ज्या परीक्षा दयायच्या व्हत्या. त्या साऱ्या दिल्या व्हत्या. यकच राहिली व्हती. त्याचा बी त्यानं चांगला अभ्यास् केला व्हता. तो दिवसबी जवळ आला व्हता. त्याच्या कालेज मदली काही मुलं गुंड व्हती. हुषार नव्हती पर त्यांच घरानं श्रीमंत व्हतं. म्हणून शान ती सगळ्यावर दादागिरी करत व्हती. कालेज मंदी प्रसाद हुषार व्हता. म्हणून ती पोर त्याला अभ्यास करायला देत नव्हती. तरी बी प्रसाद रात्री अभ्यास करत व्हता.

परीक्षेचा दिवस उजाडला. प्रसाद घरातून बाहिर पडला. थोड्या दुरवर जाई तोपातुर ती पोरं त्याच्या समोर येवून उभा राहिली. प्रसादानं पुढं जाण्याचा परयत्न केला. पर ती पोरं लई वांड. त्याला पुढं जाऊ दिनात. अन् त्याचा छळ करायला लागली. मग मात्र प्रसादानं एकाला मारलं. मग ती सारी पोर त्याच्या अंगावर धावून आली अन् त्याला बेदम मारलं. बिचारा एकटा प्रसाद कुणा कुणासंग भांडणार व्हता त्यो. त्या पोरांनी त्याला चांगलाच चोपून काढला अन् ती पळून गेली. तो बेशुद्ध पडला व्हता.

Besides, during a time span of last ten years, it is seen that the over all imports shot up tremendously in comparison with the exports. Rise in international oil prices was not the only cause for this situation. Indeed, the Gulf war affected us indirectly. The large contingent of Indian technicians, skilled and unskilled workers engaged on various projects in Iraq Kuwait and nearby Arab countries, had to return home suddenly. The inflow of foreign exchange from the NRI's stopped abruptly and their return to home land in flocks added problems to our already weak financial status.

Due to various factors stated above, the value of rupee in International market, had to be reduced continuously. Our rupee today is worth less than two paise, of the basis of 1948's prices. Apart from

the rupee devaluation Government has prepared to follow certain other measures in support of devaluation so as to impose the economic crisis they are facing

a) Immediate changes to be made in sick public sector units. All public sector units will be subjected to stricter financial monitoring.

b) Stringent measure to be adopted by reserve bank curb on increase in lending interest rates so as to disuade the industries and institutions from borrowing new funds.

c) Change in import and export policies so as to give more boost to exports.

d) Control on expenses of various ministeries of Central and State Government.

e) Promotion for measures of reduction in petrol, diesel and lubricants, so as to reduce overall consumption of these items which need large amount of foreign exchange for importing crude oil.

f) Policy changes for promoting agriculture and agricultural products.

g) Exit policy to raise productivity and employment by giving incentives to the early retirements, such measures have been followed by the central Government with gradual improvement in the Finance Fronts, which is rather expected and essential, Let us wish the best for the remedies adopted by our present Government to improve the financial situations and international reputation. We all are looking at the silver lining of dark cloud and are hoping that we would get stable again and our rupee will attain the place of pride in the world money market. Rising sun brings a new hope every day So the financial future of our economy can not be predicted but at least should not harm us.

## Value of Rupee After Devalution (Bombay Rates)

| Important currency | units | Exchange Rate in Rs. | | Difference |
|---|---|---|---|---|
| | | as on 4-7-91 | as on 27-6-91 | |
| Pounds Sterling | 1 | 41.70 | 34.45 | 7.25 |
| U.S.A. Dollar | 1 | 25.89 | 21.00 | 4.88 |
| Danish Mark | 1 | 14.18 | 11.77 | 2.41 |
| French Frank | 1 | 04.18 | 03.46 | 0.77 |
| Japnees Yen | 1 | 00.18 | 00.15 | 0.03 |

oooooooooooooooooooooooooo

# RABINDRANATH TAGORE :

## LIFE AND CAREER

Miss Anupama Nimbalkar
B.A.II

Rabindranath Tagore was born in Calcutta on 7th May, 1861. Tagore's family was not orthodox, it was enlightened. In the familv almost everyone was interested in art as well as in politics. Dwijendranath, Rabindranath's elder brother, was a philosopher his another brother, Joytirindranath was an artist. Satyendranath, the second brother was the first Indian to enter the Civil service. His nephews, Abanindranath and Gajendranath, were welknown Indian artists. In such atmosphere, Rebindranath grew up where there was taste for fine arts and political interest as well. Free from clutches of orthodoxy, they were much enlightened people.

Rabindranath's father was known as 'Maha Rishi' who was too busy to pay attention to the child. Rabindranath was looked after by his servants, who did not allow him to go out of the house. Naturally he wanted to live like a common child but unfortunately he coundn't. Tagore himself explains that here is the germ of his poetry. He himself comments upon the stage of life as not so happy period. All those things resulted in nervousness. But later on Rabindranath got rid of it.

His education began quite early. He believed in self-education and never bothered much about school-curriculum. He was not happy with such education which is compelled on the students. Later on 'he was educated by his brother, Hemendranath. In 1878, he was sent to London. But his stay at London was not so hopeful. In 1880, he returned to India and again in 1881. He was sent to England. The conventional formal education was never liked by him. He educated himself. He was the lover of nature and he believed that there is no greater teacher than nature. Since his family was a rational one, he learnt much from the home-discussions.

His brother Jyotindranath's wife, Kadambari Devi had great influence on him. She was an enlightened lady. She was interested in art and literature and had progressive views. She was a sympathetic friend and companion to the lovely child. She encouraged him to write She was an admirer of the young writer. She was the first critic but at the same time she helped him to be a confident writer. In 1875, Tagore's mother died and Kadambari Devi cared for and looked after him as his mother.

Rabindranath was a born poet. He started writing when he was only seven years old. His 'Sandhya Sangeet' published in 1882 which was followed by 'Prabhat Sangeet' which was published 1883. Through the publications of these poems, he launched his career.

In December 1883, he married to Mrinalini Devi. Such domestic affairs did not hinder his career. He was also the secretary of 'Brahmo Samaj' in this period. He also participated in the second session of Indian National Congress. He was a

stern critic of Hindu Casteism, for which he conflicted with many eminent personalities.

Later on his father asked him to look after their family estate laying scattered in North Bengal and Orissa. He experienced many things. For the first time he came in close contact with the people of the lower starta of the society and this was the period of his deepest communion with Nature. He tried for the development of agriculture and proved to be a good merchant. This experience, intimacy with massess transmitted in **"Torn Letters'** where we witness his deep sympathy for poor people. **'Torn Letters'** contains many passages of the best prose that he ever wrote. In this period he wrote. **'Chitra', 'The Baby's Return', 'Chitraganda', 'Sonar Tari', 'The Boat of Gold'.**

With the year 1900 begins another phase in the career of Tagore. It is a period of pause. In the early phase we witness spiritual quest through disorder and conflicts. In **1896** he wrote **'Caitali'. 'Kahini'**, represents the next phase in Tagore's poetry. Here he used many Hindu myths and legends. It was the period of romantic imagination. In his next work **'Katha O Kahini'** (1900), Tagore steps into the world of history and mythology. Herosim, dramatic legends of nobility were the characteristics of the work. While writing **'Kalpana'** the moods were gay and no varied themes were introduced.

With **'Naibedya** (1901) begins a new phase in Tagore's poetry. His soul turned to God. We find smoothness in the collection. He made a great experiment at Bolapur. His father purchased certain land where he built an Ashram, which was called as 'Shantiniketan'. Rabindranath Tagore founded here his open air school. It was a revolt against formal, stereotyped education confined in walls. Tagore emphasised on artistic activities, such as, painting and acting. He wanted the development of all round personality of the student. This school gradually developed in the world famous University, Vishwa Bharathi.

In 1902, Tagore's wife died, she was a real partner of his visions and worries. After her death, Tagore wrote a series of touching lyrics, **'Smaran'** which resembles Milton's **'Lycidas'** and Shelley's **'Adonious'.**Here the poet mourns the death of his wife. He also wrote some poems for children called **'Sisu'.** After that his daughter Renuka, died. But in spite of these shocks he went on writing The poet accepted it as a part of the rhythm of life. In 1905, his father died. Tagore took part in **Swadeshi** Movement. He wanted to abolish innocence of the common people about their rights, some people did not like it and Rabindranath Tagore was removed from the movement. But he, for the first time, taught us that 'Swaraj' is not to be begged but to be claimed as a-right.

Rabindranath Tagore went to Europe to acquaint with the ideals of his school. Before 'Geetanjali', he wrote **'Utsarga'** and **'Kheya'.** Next followed the trio **Gitanjali** 1910, **Englished** 1912, **Gitmala,** 1914, and **Gitali** 1914. The English publication of**Gitanjali** brought Nobel Prize and world fame to the poet. The poets like Yeats admired his **Gitanjali.** It followed **'Balaka', 'Palatka', 'Purabi', 'Mahua', 'Banabani', 'Parises'** etc.

Calcutta University offered him doctorate. He also wrote poems, articles, short - stories and plays. He visited many countreis such as Germany, Italy, China, Japan, and many other countries of Europe.

Many doctorates of **literature** were conferred upon him by a number of universities. On his 70th birthday. 'The Golden Book of Tagore was published. Then he took part in politics. Gandhaji called him the Great Sentinel that he watched in an age of fading spirituality over the great ideals of love, joy and freedom'. In 1940, he was taken seriously ill and on 7th August 1941, he passed away. He was mourned all over the world.

●●●●

## ❋ Patriotism



*Renunciations, only word*
*Haunts that patriot.*
*And nothing else*
*Remains in this world*
*To do for them.*

*Sheer outwardly garlands*
*Bestowed on their photos.*
*On their Remembrance day*
*And nothing else*
*Remains after displaying*
*Showy emotions.*

*But mothers' cry*
*Doesn't beliveve in Patriotism.*
*Her only son*
*Futilely shot dead*
*And Earth becomes graveyard*
*Her home coffin.*
*Nothing else*
*Remains for her.*

*Fatherly emotions*
*Corked with heavy burdens*
*After lost son*
*Nothing else*
*Remains for him*
*To do with the world.*
*His only progeny, his*
*Entire wealth drowned*
*Futilely in the ship-wreck*
*of Nation.*

*Earnest cry came from*
*His beloved*
*Nothing else*
*Remains for her in this world*
*Her only blossom*
*Nipped from the ruthless frost*
*And spring grudges*
*To enter in her life.*
*Groȁn with utmost grievance*
*She stopped the crowd with shout*
*WHAT A NONSENSE PATRIOTISM!*

**Miss Rajnanda Deshmukh/B.A.III**

## ❋ All of us are Vital

*Which is more important*
*the potter or the clay?*
*what adds most to drama*
*the actor or the play?*

*What makes music joyful*
*skilled players or the score?*
*what keeps garden growing*
*good seeds, hard work, or more?*

*What flies loved ones homewards*
*the pilots or the planes?*
*what keep railways running*
*the engineers or trains?*

*All of us are vital*
*to god's great master plan;*
*we were all created*
*to the best we can.*

**Miss V.K.Padma/XII th Com.**

## ❋ Though I Keep quiet!

*Though I keep quiet*
*I listen to an impatient roaring*
*Which increases every moments.*
*And, Alas! I am no more,*
*calm and quiet.*
*That roaring is coming from an ocean*
*That ocean is spreading its arms*
*Really I am afraid of its paws.*
*I am restless now,*

*Though I Keep quiet,*
*An impatient roaring makes me restless.*
*I am sinking deep in the tides,*
*And I take a last glance,*
*I look around fearfully*
*Tides are not tides.*
*But my country men,*
*Ocean is not ocean*
*But my mother country*
*Now I won't keep quiet.*

**Miss Rajnanda Deshmukj/B.A.III**



◀ कु.सुचेता जाधव
बी.कॉम.भाग २



कु.विद्या पाटील ▶
बी.ए.भाग ३



◀ कु.कल्पना कदम
बी.ए. भाग ३

दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट
नियम ८, फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक असलेली माहिती.


प्रकाशन स्थळ – तराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रकाशन काळ – वार्षिक

मुद्रकाचे नांव – श्री.श्री.सी.गोसावी, राजहंस प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर

राष्ट्रीयत्व – भारतीय

पत्ता – २५० ब / २७,नागाळा पार्क, कोल्हापूर

प्रकाशकाचे नाव – प्राचार्य डॉ.क्रांतिकुमार रं.पाटील

राष्ट्रीयत्व – भारतीय

पत्ता – कमला महाविद्यालय, ताराराणी विद्यापीठ, राजारामपूरी, कोल्हापूर.

संपादकाचे नांव – प्रा.सुमती रा.साळुंखे

राष्ट्रीयत्व – भारतीय

पत्ता – कमला महाविद्यालय, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

मालकी – कमला महाविद्यालय, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

मी डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील



कु.जाधव सुचेता
बी.कॉम.भाग - २

# वार्षिक अहवाल

१९९१ - ९२

# अनुक्रमणिका


१) जिमखाना

२) क्रीडा नैपुण्य

३) राष्ट्रीय छात्र सेना

४) वार्षिक स्नेहसंमेलन

५) राष्ट्रीय सेवा योजना

६) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग

७) प्राध्यापक प्रबोधिनी

८) निरंतर शिक्षण

९) ग्रंथालय अहवाल

१०) विविध कलागुण विकास मंडळ

११) सहल विभाग

१२) गुंजारव भित्तीपत्रक

१३) वादविवाद व निबंध स्पर्धा समिती

# वार्षिक अहवाल

## १९९१ - ९२

## ★ जिमखाना

आमच्या महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाच्या निवडणुका २७ ऑगस्ट १९९१ रोजी प्राचार्य डॉ.क्रांतिकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. निवडून आलेल्या विद्यार्थिनी प्रतिनिधी पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| १) बी.ए.भाग १ | - कु.पाटील नंदिनी रामकृष्ण |
| | - कु.शेख दिलशाद महमंद |
| २) बी.कॉम भाग १ | - कु.मगदूम अर्चना सुभाष |
| ३) बी.ए.भाग २ | - कु.शिंदे वर्षा जयसिंग |
| | - कु.सय्यद पूनम सिकंदर |
| ४) बी.कॉम भाग २ | - कु.जाधव सुचेता शिवाजीराव |
| ५) बी.ए.भाग ३ | - कु.देशमुख राजनंदा हिंदुराव |
| ६) बी.कॉम भाग ३ | - कु.माने कीर्ती विलास |

कनिष्ठ विभागातून निवडून आलेल्या विद्यार्थिनी प्रतिनिधी पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| १) ११वी कला | - कु.पाटील वैशाली विठ्ठलराव |
| | - कु.गुजर सुवर्णा शिवलाल |
| २) ११वी वाणिज्य | - कु.घोरपडे मनीषा फत्तेसिंग |
| ३) १२वी कला | - कु.निंबाळकर अर्चना नानासाहेब |
| | - कु.उगळे वर्षा श्रीकान्त |
| ४) १२वी वाणिज्य | - कु.किल्लेदार तेजस्विनी रामचन्द्र |
| ५) ११वी विज्ञान | - कु.कोळी स्मीता भूपाल |
| ६) १२वी विज्ञान | - कु.वासुदेवन दीपा |

विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून कु. माने कीर्ती विलासराव यांची निवड झाली.

## ★ क्रीडा नैपुण्य :-

वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी कोल्हापूर झोन स्पर्धेत बास्केट बॉल, व्हॉली बॉल, बॅडमिन्टन, टेबल टेनिस, बुध्दिबळ व ॲथलेटिक्स मध्ये भाग घेतला. त्यापैकी झोन विभागात बास्केट बॉल संघाने अजिंक्यपद मिळविले. हा संघ आंतरविभागीय स्पर्धा खेळावयास बार्शी येथे गेला

होता. या संघात कु.कुलकर्णी संपदा, कदम सुचित्रा, पंदारे वैशाली, कांबळे सुलोचना, खोत कल्पना, सुवार्णा लीला, माने कीर्ती, शेट्टी सुनिता, पाटील सुजाता, चौगुले स्वरुपा, निकम मधुमती, वडींगेकर शोभा, मोळे गीता यांचा समावेश होता. हाच संघ आंतरविभागीय हॅन्डबॉल स्पर्धा खेळण्याकरिता सोलापूर येथे गेला होता.



**माधवी पोतदार :** १) शिवाजी विद्यापीठ बुद्धिबळ संघात निवड
२) औरंगाबाद येथे झालेल्या चेस चँपियन स्पर्धेत प्रथम क्रमांक
३) कालिकत येथे झालेल्या नॅशनल (ज्यु.) गर्ल्स चेस चँपियन स्पर्धेत सहभाग



**संपदा कुलकर्णी :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, झोन स्पर्धेत भालाफेक मध्ये प्रथम क्रमांक



**सुचित्रा कदम :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, झोन स्पर्धेत लांब उडी मध्ये तृतीय क्रमांक

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर झोन मध्ये ४ x १०० रिलेमध्ये आमच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. या संघात सुचित्रा कदम, सुनिता शेट्टी, सुजाता पाटील, वैशाली लोंढे, व धनश्री पाटील यांचा सहभाग होता. या सर्व ॲथलिटस्नी आंतरविभागीय ॲथलेटीक्स - मीट मध्ये भाग घेतला.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने शासकीय क्रीडा स्पर्धेत शहर स्तरावर कबड्डी, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेबलटेनिस, बॅडमिंटन, हँडबॉल, ज्युदो व ॲथलेटिक्स इ. स्पर्धांमध्ये भाग घेतला. त्यापैकी कबड्डी, बास्केटबॉल व टेबलटेनिस संघाला अजिंक्यपद मिळाले. व्हॉलीबॉल संघाला उपविजेतेपद मिळाले. कबड्डी

संघात योगिता कांबळे, छाया पाटील, लता पाटील, उल्का भोसले, सुषमा पाटील, माया जाधव, जयश्री पाटील, उन्मना पाटील, मनीषा माजगावकर, आशाराणी मालगावे, शिराणे, रजनी कोळी यांचा समावेश होता. बास्केटबॉल संघात तेजस्विनी किल्लेदार, प्रतिभा धाटुंबे, उषा पाटील, जयश्री कदम, रेहाना जमादार, पल्लवी काकडे, दिपाली दत्ताणी, सुचित्रा भोसले, राखी शिवराईकर व तृप्ती खेडेकर यांचा समावेश होता. व्हॉलीबॉल संघात शकुंतला हवालदार, विजयमाला पाटील, मनीषा सुतार, वैशाली तिवारी, नीता गेंगे, सुचित्रा मोरबाळे, कल्पना उदाळे, शुभांगी पाटील, सुवर्णा गुजर, संगीता मोरे, सविता माळी व शोभा रोकडे यांचा समावेश होता. टेबलटेनिस संघात गायत्री भागवत, दिपाली भोसले, राजश्री शिंदे, सुजाता सावंत यांचा समावेश होता. कबड्डी, बास्केटबॉल, टेबलटेनिस हे संघ जिल्हास्तरावर अजिंक्य ठरले. तसेच कबड्डी व टेबलटेनिस संघानी विभागीय स्पर्धेत विजेतेपद मिळविले. टेबलटेनिस संघाने औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये भाग घेऊन उपविजेतेपद मिळविले.

हँडबॉल संघाने विभागीय स्पर्धेसाठी कोल्हापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. या संघात युगंधरा नाईक, वैशाली पाटील, रूपाली शिंदे, रेखा पाटील, क्षमा चव्हाण, तेजस्विनी किल्लेदार, प्रतिभा धाटुंबे, रेहाना जमादार, राखी शिवराईकर, पल्लवी काकडे, शकुंतला हवालदार व सुजाता सावंत यांचा समावेश होता. ज्युदोमध्ये कुमुदिनी करंजेकर व वनिता जाधव यांना अनुक्रमे ४५ व ६० किलो वजन गटात जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांक मिळाला. ॲथलेटिक्समध्ये शहरस्तरावर वरिष्ठ गटात वैशाली पाटीलला उंच उडी व लांब उडीमध्ये अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळाला. कनिष्ठ गटात लांबउडीमध्ये लता पाटील हिचा दुसरा क्रमांक आला. वरिष्ठ गटात योगिता सूर्यवंशी हिने १०० मी. धावण्यात तृतीय क्रमांक मिळविला. तेजस्विनी किल्लेदार हिचा वरिष्ठ गटात गोळाफेक, थाळीफेक मध्ये प्रथम क्रमांक व भालाफेक मध्ये तृतीय क्रमांक आला. कनिष्ठ गटात प्रतिभा धाटुंबे हिने गोळाफेक मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच रिले संघाने ४ x १०० मी. मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. या संघात वैशाली पाटील, शोभा रोकडे, विजयमाला पाटील, शकुंतला हवालदार यांचा समावेश होता.



**गायत्री भागवत :** औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय टेबलटेनिस स्पर्धेमध्ये संघाला उपविजेते पद मिळवून दिले. या स्पर्धेतून मिझोराम येथे झालेल्या राष्ट्रीय टेबलटेनिस स्पर्धेकरिता निवड. तेथून दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय टेबलटेनिस कँपकरिता निवड.



**दिपाली भोसले :** विभागीय टेबलटेनिस स्पर्धेत विजेतेपद मिळवून राज्य टेबलटेनिस स्पर्धेकरिता निवड.



**लता पाटील** :खुल्या राज्यस्तरीय कबड्डी अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेकरिता कोल्हापूर जिल्हा संघात निवड.



**छाया पाटील** :खुल्या राज्यस्तरीय कबड्डी अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेकरिता कोल्हापूर जिल्हा संघात निवड.



**वैशाली पाटील** :विभागीय ॲथलेटिक्स (उंच उडी) मध्ये द्वितीय क्रमांक मिळवून राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेकरिता निवड.



**तेजस्विनी किल्लेदार** :शासकीय क्रीडा स्पर्धेत कोल्हापूर विभागात गोळाफेक व थाळीफेक मध्ये तृतीय क्रमांक.



**वनिता जाधव :** शासकीय स्पर्धेमध्ये जिल्हा स्तरावर ज्युदो स्पर्धेत (६०कि.वजन गट) तृतीय क्रमांक



**कुमुदिनी करंजेकर :** शासकीय स्पर्धेमध्ये जिल्हा स्तरावर ज्युदो मध्ये (४५कि.वजनगट) तृतीय क्रमांक.

शासकीय महिला क्रीडा स्पर्धेत बास्केटबॉल संघाने जिल्हास्तरावर अजिंक्यपद मिळविले. या संघात नंदा भोसले, वंदना तावडे, सुचित्रा कदम, संपदा कुलकर्णी, कल्पना खोत, सुजाता पाटील, सुवार्णा लीला, पद्मश्री अथणे, कीर्ती माने व सुनिता शेट्टी यांचा समावेश होता. हा संघ विभागीय स्पर्धा खेळण्यासाठी रत्नागिरी येथे गेला होता. तेथे सुचित्रा कदम, नंदा भोसले, संपदा कुलकर्णी यांची निवड अमरावती येथे झालेल्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेकरिता झाली. तसेच चॅलेंजर्स स्पोर्टस् क्लबतर्फे घेतलेल्या खुल्या बास्केटबॉल स्पर्धेत शहर स्तरावर या संघाला अजिंक्यपद मिळाले.

**विभाग प्रमुख**

प्रा.सौ.एस.एम.काळे
वरिष्ठ विभाग

प्रा.सौ.एस.एस.पाटील
कनिष्ठ विभाग



**प्राचार्यांसमवेत शासकीय स्पर्धेमध्ये विभागीय उपविजेतेपद मिळविलेला कबड्डी संघ**

## ★ राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) :

आमच्या महाविद्यालयातील वीर छात्रांनी सेवा शुश्रूषेपासून शिस्त, नेतृत्व आणि नेमबाजी या सर्व क्षेत्रात नेत्रदीपक यश संपादन केले आहे.



**अंडर ऑफिसर शुभांगी सावंत :** राष्ट्रीय स्तरावरील केरळ येथे पार पडलेल्या बेसिक लिडरशीप कॅम्पमध्ये सहभाग.



**कार्पोरल अलका रायमाने :** उटी येथे संपन्न झालेल्या ऑल इंडिया ट्रेकिंग कॅम्प मध्ये यशस्वी सहभाग.
१९९१ - ९२ 'बेस्ट कॅडेट'.



**कॅडेट वनिता जाधव :** पुणे येथे पार पडलेल्या मेडिकल अॅटॅचमेंट कॅम्पमध्ये सहभाग.

कॅडेट सीमा उन्हाळे पुणे येथे झालेल्या मेडिकल अॅटॅचमेंट कॅम्प मध्ये सहभागी होती. पलुस येथे संपन्न झालेल्या वार्षिक शिबिरामध्यें आमच्या २५ छात्रांनी यशस्वी सहभाग घेतला. चार जिल्ह्यातून होणाऱ्या वार्षिक शिबिरातील स्पर्धामध्ये आम्ही आमची आघाडी कायम राखली. कार्पोरल अलका रायमाने हिने सोलो साँग व सीमा उन्हाळेने वैयक्तिक नृत्यामध्ये क्रमांक मिळविला. रक्तदान म्हणजे जीवनदान व सामाजिक बांधिलकी आणि ही जबाबदारी अंडर ऑफिसर शुभांगी सावंत, सार्जंट अर्चना हिप्परगी व कॅडेट सुनिता गावडे या छात्रांनी पार पाडली. 'बी' प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल १००% लागला. व 'सी' प्रमाणपत्र परीक्षा चार कॅडेटस् उत्तीर्ण झाले.

**प्रा.सौ.सुमित्रा ढाबासाहेब पोवार.**
सेकंड लेफ्टनंट एन.सी.सी. विभाग प्रमुख.

## ★ वार्षिक स्नेहसंमेलन :

रिमझिम मेघांच्या वर्षावात जेव्हा सारी धरती मृद्‌गंधाने पुलकित होते तेव्हा तजेलदार वृक्षवेलींच्यासारखी नवी आशा व नवी उमेद घेऊन विद्यार्थिनी ताराराणी विद्यापीठाच्या प्रांगणात वावरु लागतात. नव्या आशावादाने आपल्या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करतात व या त्याच्या दैनंदिन शैक्षणिक उपक्रमाबरोबरच त्याच्या चमकदार व वैशिष्ट्यांने पूर्ण, कलात्मक, सुप्तगुणांना फुलोरा येतो तो वार्षिक स्नेहसंमेलनाच्य रूपाने!

या वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्याचा शुभारंभ कॉलेजच्या प्रांगणात रविवार दि. २६ जानेवारी १९९२ रोजी मौज जत्रा, विविध खेळ, रांगोळी व मेहंदी स्पर्धा इत्यादी कार्यक्रमाच्या आयोजनाने झाला. सोमवार दि. २७ जानेवारी १९९२ रोजी शाहू सांस्कृतिक हॉलमध्ये बहारदार विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यामध्ये श्रोतृवृंदाना आकर्षित करणारी मराठी भावगीते, हिंदी - मराठी सिनेगीते विविध प्रकारची नृत्ये, फॅन्सीड्रेस व नकला इत्यादींचे प्रदर्शन करण्यात आले. ''पाहुणे येता मंडळात'' ही एकांकिका रसिकांच्या मनावर आपला प्रभाव टाकून गेली. तीन तास चाललेल्या या कार्यक्रमास प्रेक्षकांनी व विद्यार्थिनींनी दाद दिली.

सोमवार दि. १७ - २ - १९९२ रोजी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या उपस्थितीत व मा. आमदार बाबासाहेब पाटील(सरुडकर) यांच्या हस्ते स्नेहसंमेलन पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. त्यांनी आपल्या संदेशपर भाषणात शिक्षण क्षेत्रातील विविध अपप्रवृत्तीविषयी नाराजी व्यक्त केली. ''प्राथमिक स्तरावर ग्रामीण विभागात जे शैक्षणिक कार्य चालते ते खेदजनक असून त्यात आमूलाग्र बदल झाले पाहिजेत. विद्यार्थिनींनी शैक्षणिक संधीचा लाभ घेऊन आपले व्यक्तिमत्व समर्थ बनविले पाहिजे.'' असे विचार व्यक्त केले. या नंतर वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धा व इतर स्पर्धामध्ये नैपुण्य दाखविलेल्या विद्यार्थिनींना तसेच सन १९९१ - ९२ या शैक्षणिक वर्षात विविध विषयात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींना पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे शिल्पकार, शिक्षण महर्षि मा.डॉ.व्ही.टी.पाटील होते.

वार्षिक स्नेहसंमेलन पार पाडण्यासाठी सर्व समित्यांचे चेअरमन, प्राध्यापक, इतर कर्मचारी, विद्यार्थिनी प्रतिनिधी, खेळाडू व कलाकार या सर्वांच्याकडून बहुमोल सहकार्य मिळाले.

**प्रा. एन.एस.शिरोळकर**
स्नेहसम्मेलन कार्याध्यक्ष



विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे
उद्‌घाटन करताना
प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील.




विनोदी एकांकिका
'पाहूणे येती मंडळा'



बहारदार टिपरी नृत्य



'रहने को घर नही'
आजच्या युवकांची स्थिती गाण्यातून
सादर होताना

●●●●●

## ★ राष्ट्रीय सेवा योजना

आजचे विद्यार्थी समाजाभिमुख व्हावेत, समाजाशी जवळून त्यांचा परिचय व्हावा या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजना ही महत्त्वाची योजना आहे. NOT I BUT YOU या ध्येयाने प्रेरित होऊन आमच्या विद्यार्थिनींनी पुढील कार्ये केलेली आहेत.

**नियमित सेवा योजना**

राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे मौजे चिंचवाड या खेड्याची निवड केली. त्या ठिकाणी अनेक प्रकल्प व विविध कामे हाती घेऊन यशस्वी केली.

शहरी संस्कृतीत वाढलेल्या व विशेषतः शारीरिक कष्टाचा अनुभव नसलेल्या आमच्या विद्यार्थिनींनी शारीरिक कष्टाची कामे करून स्त्रिया शारीरिक कष्टाची कामे करू शकत नाहीत हा समज दूर केला. चिंचवाडमध्ये वेळोवेळी जाऊन तेथील रस्ता दुरुस्ती, क्रीडांगण स्वच्छता, वृक्षारोपण सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता इत्यादी कामे केली.

कोल्हापूरमधील ज्ञान प्रबोधन भवन संचलित अंधशाळा, या संस्थेला भेट देऊन आमच्या विद्यार्थिनींनी अंध बालकांना बंधूभावाने राख्या बांधल्या व मिठाईचे वाटप केले. तसेच कॉलेजच्या परिसरातील असणाऱ्या झाडांना आळी करून पाणी घातले व गाजर गवताचे निर्मूलन केले.

**जनसाक्षरतेसाठी विशेष श्रम संस्कार शिबीर**

राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक जनसाक्षरता शिबीर मौजे वळीवडे येथे दि. १८-११-९१ ते २७-११-९१ या काळात संपन्न झाले. या शिबीराचे उद्घाटन उप सरपंच मा.शामराव जगताप यांच्या हस्ते झाले. या शिबीरामध्ये जनसाक्षरता समाजप्रबोधनन, मनोरंजन व श्रम हेतू शिबिरार्थीनी साध्य केले.

या दहा दिवसाच्या शिबिरामध्ये आमच्या विद्यार्थिनींनी मौजे वळीवडे येथील बेघर वसाहतीतील जनसाक्षरता सर्वेक्षण केले व निरक्षर स्त्रियांच्या घरी जाऊन त्याना अक्षर ओळख करून दिली. तसेच प्राथमिक शाळेच्या पटांगणातील स्वच्छता केली व आवारामध्ये कर्दळी लावणे, झाडे लावणे इ. कामे करून श्रमाची प्रतिष्ठा वाढविली. याशिवाय गावातील रस्त्यावरील खड्डे बुजविणे, विकास सेवा सोसायटीच्या आवारातील बागेची स्वच्छता करणे, मेंदीचे कुंपण तयार करणे इ. कामे केली.

श्रमाबरोबर सामाजिक प्रबोधन व्हावे म्हणून अनेक नामवंत व्यक्तिंची व्याख्याने आयोजित केली. यामध्ये दारुबंदी, विणकाम प्रात्यक्षिके, जनसाक्षरतेत महिलांचा सहभाग, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सधन ऊसाची लागवड या विषयावर दारूबंदी अधिकारी दि.रा. शेटे, ग्रामपंचायत सदस्या राजमती कुसाळे, प्रा.रेखा पंडित, मा.नांद्रे गुरूजी, डॉ.ए.एल. काळे, डॉ.अरूण हसबनीस इ. तसेच मा.आर.एस. माने इ. मान्यवरांची व्याख्याने झाली.

**प्रा.जे.बी. पाटील**
**प्रा.एन.एस. शिरोळकर**
**प्रकल्प अधिकारी**

**प्रा.ए.एस. घस्ते**
**प्रा.सौ.बी.व्ही. चव्हाण**
**सहाय्यक प्रकल्प अधिकारी**

**राष्ट्रीय सेवा योजना**

## ★ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग

या विभागाच्या कार्यक्रमाची सुरूवात विविध स्पर्धा परीक्षांची माहिती देण्यापासून झाली. विद्यार्थिनीनी या परीक्षा द्याव्यात, त्यात यश संपादन करावे यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. निरनिराळ्या ठिकाणी आयोजित केलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी विद्यार्थिनीना मार्गदर्शन केले गेले. विविध नियतकालिके, पुस्तके विद्यार्थिनींना ग्रंथालयातून उपलब्ध करून देण्यात आली. हे कार्य राबवण्यास या विभागातील प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**प्रा.सुमती साळुंखे**
**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विभाग प्रमुख**

## ★ प्राध्यापक प्रबोधिनी

१९९१-९२ या शैक्षणिक वर्षात प्राध्यापक प्रबोधिनीतर्फे पत्रकार श्री सुभाष देसाई यांचे 'इंडोफ्रेंच कल्चर तुलनात्मक अभ्यास' या विषयावरती अभ्यासपूर्ण असे व्याख्यान झाले. त्याचबरोबर प्रा.डॉ.रमेश जाधव यांचे 'शाहू महाराज व धार्मिक क्रांती' या विषयावरती संशोधनपूर्ण असे व्याख्यान संपन्न झाले.

**सुमती साळुंखे**
विभाग प्रमुख

## ★ निरंतर शिक्षण

समाजाच्या शिक्षणविषयक गरजा अनौपचारिकरीत्या पूर्ण करणारे प्रभावी साधन म्हणजे निरंतर शिक्षण: शिक्षणापासून वंचित राहिलेल्या गृहिणींना जीवनोपयोगी शिक्षण व कौशल्ये द्यावी या हेतूने शिवाजी विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण विभागांअतर्गत आमच्या महाविद्यालयामार्फत ''बेकरी ॲन्ड कन्फेक्शनरी व ड्रेस डिझाईनिंग'' हे कोर्स राबविले गेले. तसेच याच विभागामार्फत महिलांना स्वयंसंरक्षणार्थ आवश्यक असलेला ''ज्युडो - कराटे'' प्रशिक्षण वर्ग हाही उपक्रम पार पाडला.

वरील सर्व कोर्सच्या नियोजनासाठी क्रीडा व गृहशास्त्र विभागाच्या सहकारी प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

**प्रा.एस्.एन्. कोळेकर**
प्रकल्प प्रमुख

## ★ ग्रंथालय अहवाल

आज अखेर कमला महाविद्यालयाची ग्रंथसंख्या १२६८५ इतकी झाली असून किम्मत २ लाख ५६ हजारावर गेली आहे. यावर्षी बुक बँकेतून ६७२६ पुस्तके दिली असून त्याचा लाभ ९८२ विद्यार्थिनींनी घेतला आहे. खेळाडू व हुशार अशा एकूण ७२ विद्यार्थिनींना या ग्रंथालयातून पुस्तकांचे संच मोफत देण्यात्त आले आहेत. ग्रंथालयात एकूण ५४ मासिके व ७ दैनिके येतात. यासाठी वर्षाला १० हजार रूपये खर्च केले जातात.

चालू आर्थिक वर्षात १६५२ नवीन पुस्तके खरेदी केली असून ५१ हजार रूपये खर्च झाले आहेत. चालू वर्षी क्रमिक पुस्तकासाठी लागणाऱ्या संदर्भ ग्रंथाची जास्त खरेदी केली असून मराठी साहित्यातील

●●●●●

सर्व प्रकारची नवीन पुस्तके खरेदी केली आहेत. १२ वी सायन्ससाठी १२ हजार रूपयांची नवीन क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ घेतले आहेत. यापुढे सायन्स विभाग समृद्ध करण्याचा मानस आहे. पुढील वर्षात यु.जी.सी. च्या अनुदानातून ग्रंथायलासाठी नवीन इमारतीचे बांधकाम सुरू होणार आहे. यु.जी.सी. च्या अनुदानातून पुढच्या वर्षी भरपूर संदर्भ ग्रंथ ग्रंथालयासाठी घेण्याचा विचार आहे. यासाठी माननीय डॉ.व्ही.टी.पाटील, संस्थापक ताराराणी विद्यापीठ व प्राचार्य क्रांतिकुमार पाटील प्रयत्नशील आहेत.

**श्री.जे.पी. जाधव**
ग्रंथपाल

## ★ विविध कलागुण विकास मंडळ

विविध कलागुण विकास मंडळातर्फे चालू वर्षी प्रथम सत्रात श्रावणपंचमी १४ ऑगस्ट १९९१ या दिवशी ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष मा.डॉ.व्ही.टी. पाटील तथा ती. काकाजींचा ९२ वा वाढदिवस शारदा मंदिरात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

द्वितीय सत्रात सोमवार दि.९-१२-९१ रोजी बेळगावचे अपंग गायक श्री.जोसेफ यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कॉलेजतर्फे त्याना आर्थिक मदत देण्यात आली. गुरूवार दि.१२-१२-९१ रोजी मे.भारत पेट्रोलियम व मे.घोटणे गॅस एजन्सी यांच्या संयुक्त विद्यमाने ''गॅस सुरक्षा व गॅसबचत'' या विषयावर मा.शेखर सदानंद घोटणे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. श्रीमती नरंदे यानी प्रास्ताविक केल्यानंतर मा.अशोक पांड्ये यानी भारतात गॅस दुर्घटना का व कशा घडतात याची माहिती देऊन गॅस सुरक्षेविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. शेवटी त्यानी विद्यार्थिनीना रिफ्रेशमेंट दिली. सोमवार दि.६-१-९२ रोजी महाराष्ट्राचे थोर प्रबोधनकर्ते संत सद्‌गुरू गाडगे महाराज यांच्या जीवनांचे व कार्याचे दर्शन घडविणारे ''दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन'' व्यासंगी अभ्यासक प्राचार्य रा.तु.भगत यांच्यामार्फत भरविले होते.

शुक्रवार दि.१०-१-१९९२ रोजी शिवाजी विद्यापीठ व कमला कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने ''भद्रकाली ताराराणी व्याख्यानमाला'' आयोजित केली होती. या व्याख्यानमालेचे पुष्प श्री.स.शं. देसाई, गोवा यानी ''स्वातंत्र्यसौदामिनी महाराणी ताराबाई'' या विषयावर गुंफले. मा.प्राचार्यानी प्रास्ताविक व व्याख्यानमालेचे उद्दिष्ट व हेतू विशद करून संस्थेच्या कार्याचा धावता आढावा घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.व्ही.टी.पाटील हे होते. मंगळवार दि.२१-१-९२ रोजी कर्नल आनंदराव भास्करराव जाधव यांचे 'युद्धाच्या कथा' (पेगी कँप्बेल) या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

**प्रा.ए.एम्.साळोखे**
विभाग प्रमुख

## ★ सहल विभाग

सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात खालीलप्रमाणे सहली आयोजित करण्यात आल्या होत्या.

द्वितीय सत्रात बी.ए.भाग-३ (समाजशास्त्र) या वर्गाची शैक्षणिक अभ्यास गट म्हणून ''नव महाराष्ट्र सहकारी सूत गिरणी लि., साजणी इचलकरंजी येथे भेट आयोजित केली होती. ११वी व १२वी सायन्स विभागाची सिंधुदुर्ग, मालवण, सावंतवाडी, अंबोली येथे सहल गेली होती. तसेच बी.ए.भाग-२, १२वी 'अ' आणि 'ब' बी.ए.भाग-१ या वर्गाची सहल पन्हाळा येथे गेली होती. तसेच बी.ए.भाग-३ समाजशास्त्र व अर्थशास्त्र विभागाची सहल गोवा येथे गेली होती, आणि बी.ए.भाग-३ या वर्गाची सहल दत्त फॅक्टरी, शिरोळ येथे आयोजित केली होती. त्याचप्रमाणे ११वी सायन्सची स्टडी टूर तिलारी डॅम येथे गेली होती.

**प्रा.ए.एम्.साळोखे**
सहल विभाग प्रमुख

●●●●●

## ★ 'गुंजारव' भित्तीपत्रक

महाविद्यालयीन शैक्षणिक उपक्रमात भित्तीपत्रकांचे महत्त्व आगळेवेगळे व महत्त्वाचे असते. नवनव्या वृत्ती - प्रवृत्तींचा विकास होत असणाऱ्या युवकमनाचे दर्शन तरी अशा उपक्रमातून होतेच पण त्याशिवाय अशा वृत्तींचा निकोप विकास घडविण्यासाठीही त्यांचा खूप उपयोग होतो.

'गुंजारव' हे भित्तीपत्रक अशा दृष्टिकोनातूनच प्रकाशित करण्यात येते. महाविद्यालयाने प्रतिवर्षाप्रमाणे 'वर्षा विशेषांक' काढून मेघाच्या आगमनाची चाहूल देणाऱ्या कवितांचा अंक प्रकाशित केला. त्यानंतर 'शिक्षक दिनाचा अंक' डॉ.राधाकृष्णन् जयंतीनिमित्त प्रकाशित करण्यात आला.

'हिंदी दिनाचा' हिंदी भाषेच्या माध्यमातील आमचा विशेषांक परिश्रमपूर्वक प्रकाशित केला. त्या अंकासाठी हिंदी विभागाच्या प्राध्यापिकांनी विशेष परिश्रम घेतले. वर्ष अखेर 'अंधश्रद्धा निर्मूलन विषयक' खास अंक प्रकाशित करण्याचा मनोदय आ़हे.

'गुंजारव' विद्यार्थिनीच्या आवडीचा व चर्चेचा विषय होत आहे हेच आमचे खरे समाधान!

**श्री.जे.बी.शिंदे**
विभाग प्रमुख

## ★ वादविवाद व निबंध स्पर्धा समिती

चालू वर्षी वादविवाद व निबंध - लेखन स्पर्धेत कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींचा सहभाग उत्साहजनक व उत्स्फूर्त असा होता. शहरात विविध संस्था व महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या अशा स्पर्धामध्ये आमच्या विद्यार्थिनी मोठ्या संख्येने हजर राहिल्या. शिवाय काहींनी कथा - कथन, काव्यवाचन इ. स्पर्धामध्ये जिल्हास्तरावर सहभागी होण्याची उपक्रमशीलता दाखविली.

प्रजासत्ताक दिनानिमित्त 'युवा काव्यवाचन' उपक्रम नभोवाणी व शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आला होता. त्यामध्ये आमची विद्यार्थिनी कु.राजश्री अनंत पाटील हिची काव्यवाचनासाठी निवड झाली होती.

कोल्हापूर शहरातील अनंत करंडक कथा - कथन स्पर्धेत आमच्या कु.बेर्डे, कु.निंबाळकर व कु.पाटील यानी भाग घेतला व आपले कथाकथन कौशल्य व्यक्त केले.

गडहिंग्लज येथील डॉ.घाळी स्मृती व्याख्यानमालेत कु.हिंगमिरे ही सहभागी होऊन पारितोषिक प्राप्त ठरली.

महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलन स्पर्धेत अनेक मुलींनी भाग घेऊन वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा व हिंदी निबंध लेखन स्पर्धा यशस्वी केल्या. प्रथम क्रमांकाचे यश पुढीलप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| वक्तृत्व स्पर्धा - | कु.भोसले | ११वी आर्टस् ब |
| कथाकथन स्पर्धा - | कु.निंबाळकर | ११वी आर्टस् ब |
| हिंदी निबंध स्पर्धा - | कु.देशमुख | बी.ए.भाग ३ |

याखेरीज कु.कल्पना खोत, बी.ए.भाग ३ हिने निबंध - लेखन स्पर्धामध्ये सहभागी होऊन प्रशंसनीय कामगिरी केली.

**प्रा.जे.बी.शिंदे**
विभाग प्रमुख

# ताराराणी विद्यापीठाचे
# कमला कॉलेज, कोल्हापूर
## प्राध्यापक वर्ग
**प्राचार्य : डॉ.क्रांतिकुमार पाटील,** (एम.ए.पीएच.डी.)

### कला शाखा

**समाजशास्त्र विभाग**

| | |
|---|---|
| प्रा.टी.एस.थोरातं | एम.ए. |
| प्रा.ए.एम.साळोखे | एम.ए. |
| प्रा.श्रीमती एम.व्ही.घोटणे | एम.ए.,डी.एच.ई. |

**इंग्रजी विभाग**

| | |
|---|---|
| प्रा.जे.बी.पाटील | एम.ए.,एम.फिल्. |
| प्रा.श्रीमती एस.आर.साळुंखे | एम.ए.,एम.फिल्. |
| प्रा.श्रीमती एन.एस.धुमाळ | एम.ए.,एम.फिल्. |
| प्रा.एस.एन.कोळेकर | एम.ए.,बी.एड्. |
| प्रा.श्रीमती एम.ए.जाधव | एम.ए.,एम.फिल्. |

**हिन्दी विभाग**

| | |
|---|---|
| प्रा.श्रीमती एस.बी.पोवार | एम.ए.,बी.एड्. |
| प्रा.श्रीमती बी.व्ही.शेळके | एम.ए.,एम.फिल्. |
| प्रा.डॉ.श्रीमती व्ही.व्ही.घाटगे | एम.ए.,पी.एच.डी. |

**अर्थशास्त्र विभाग**

| | |
|---|---|
| प्रा.आर.एस.जाधव | एम.ए. |
| प्रा.श्रीमती टी.पी.पाटील | एम.ए. |
| प्रा.श्रीमती ए.व्ही.पाठक | एम.ए. |
| प्रा.श्रीमती आर.व्ही.आंबवडे | एम.ए.,बी.एड्.,एम.फिल्. |
| प्रा.श्रीमती आर.एस.प्रधान | एम.ए. |

**गृहशास्त्र विभाग**

| | |
|---|---|
| प्रा.श्रीमती आर.डी.पंडित | एम.एस्सी.,एम.फिल्. |
| प्रा.श्रीमती व्ही.के.कुलकर्णी | एम.एस्सी.,एम.फिल्. |
| प्रा.श्रीमती एम.डी.देशपांडे | एम.एस्सी.,एम.फिल्. |

**मराठी विभाग**

| | |
|---|---|
| प्रा.जे.बी.शिंदे | एम.ए.,एम.एड्. |
| प्रा.श्रीमती व्ही.ए.माडगूळकर | एम.ए.,डी.एच.ई.,एम.फिल्. |
| प्रा.श्रीमती एस.एल.देसाई | एम.ए.,बी.एड्.,एम.फिल्. |

**मानसशास्त्र विभाग**

| | |
|---|---|
| प्रा.ए.एस्.घस्ते | एम.ए.,बी.एड्. |
| प्रा.श्रीमती एल.टी.मगदूम | एम.ए. |

**इतिहास विभाग**

| | |
|---|---|
| प्रा.एन.एस.शिरोळकर | एम.ए.,एम.फिल्. |
| प्रा.श्रीमती एस.एस.पाटील | एम.ए.,एम.पी.एड्. |

**राज्यशास्त्र विभाग**

| | |
|---|---|
| प्रा.एस.आर.पाटील | एम.ए. |

**शारीरिक शिक्षण संचालिका**

| | |
|---|---|
| प्रा.श्रीमती एस.एम.काळे | एम.पी.एड्. |
| प्रा.श्रीमती एस.एस.पाटील | एम.ए.,एम.पी.एड्. |

## वाणिज्य शाखा

| | |
|---|---|
| प्रा.एस.व्ही.बागल | एम.कॉम.,डी.एच.ई. |
| प्रा.श्रीमती व्ही.व्ही.मैंदर्गी | एम.कॉम. |
| प्रा.ए.एल.नरके | एम.कॉम.,डी.एच.ई.,एम.फिल्. |
| प्रा.श्रीमती यु.डी.इंदूलकर | एम.कॉम.,डी.एच.ई. |
| प्रा.श्रीमती एम.जी.पोवार | एम.कॉम. |
| प्रा.पी.ए.गोखले | सी.ए. |
| प्रा.श्रीमती एम.एस.पाटील | एल.एल.एम. |
| प्रा.ए.एन.बसुगडे | एम.एस्सी. |
| प्रा.डी.एस.पाटील | एम.कॉम. |

## विज्ञान शाखा

| | |
|---|---|
| प्रा.ए.एस.जाधव | एम.एस्सी.,डी.एच.ई. |
| प्रा.श्रीमती एस.ए.पाटील | एम.एस्सी.,डी.एच.ई.,बी.एड्. |
| प्रा.श्रीमती एम.एम.मोकाशी | एम.एस्सी.,डी.एच.ई. |
| प्रा.श्रीमती एस.डी.नांद्रेकर | एम.एस्सी.,बी.एड्. |
| प्रा.श्रीमती पी.एम.कट्टे | एम.एस्सी.,बी.एड्. |
| प्रा.श्रीमती व्ही.जी.चिकनीस | एम.एस्सी.,एम.फिल्. |
| प्रा.पी.एस.जाधव | एम.एस्सी. |
| प्रा.व्ही.जी.पाटील | एम.एस्सी. |

## शिक्षकेतर कर्मचारी वर्ग

| | | |
|---|---|---|
| श्री.जे.पी.जाधव | एम.ए.,एम.लिब्.,एलएल.बी. | ग्रंथपाल |
| श्री.एम.व्ही.शिंदे | बी.ए. | अधीक्षक |
| श्री.बी.डी.सुतार | एल.डी.सी. | मुख्य लिपीक |
| श्री.पी.आर.पाटील | बी.कॉम. | वरिष्ठ लिपीक |
| श्रीमती यु.पी.शिराळकर | | कनिष्ठ लिपीक |
| श्री.एस.टी.लोखंडे | एम.कॉम. | कनिष्ठ लिपीक |
| श्री.एस.बी.शिंदे | बी.ए. | कनिष्ठ लिपीक |
| श्री.आर.व्ही.इंगवले | बी.कॉम. | कनिष्ठ लिपीक |
| श्री.टी.एल.कांबळे | बी.कॉम. | कनिष्ठ लिपीक |
| श्री.व्ही.एम.चिमणे | | ग्रंथालय परिचर |
| श्री.व्ही.एस.मोटे | | ग्रंथालय परिचर |
| श्री.सी.एम.स्वामी | | ग्रंथालय परिचर |
| श्री.एम.एच.संकपाळ | | ग्रंथालय परिचर |
| श्री.ए.जी.शिगावे | | शिपाई |
| श्री.डी.जी.काटकर | | शिपाई |
| श्री.जी.एन.बेटक्याळे | | शिपाई |
| श्री.वाय.बी.निवळे | | शिपाई |
| श्री.एम.जी.मोरे | | शिपाई |
| श्री.एस.एस.शेळके | | शिपाई |
| श्री.डी.बी.कोले | | शिपाई |



शासकीय महिला क्रीडा स्पर्धेत जिल्हा अजिंक्यपद मिळविलेला बास्केटबॉल संघ



बिंब - प्रतिबिंब

कु.राजनंदा देशमुख बी.ए.भाग ३.

॥ निर्मातुं शिव सुंदरम् ॥

# ताराराणी विद्यापीठाचे

# कमला कॉलेज, कोल्हापूर

(स्थापना: सन १९८४) फोन: २२२१६

**संस्थापक – अध्यक्ष : डॉ.व्ही.टी.पाटील**

शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या महाविद्यालयात कला व वाणिज्य शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाची सोय आहे. तसेच ११ वी व १२ वी **कला, वाणिज्य व विज्ञान** शाखेचे वर्गही या महाविद्यालयात सुरु आहेत.

## ● वैशिष्ट्ये ●

★ विद्यार्थिनींच्या विकासाला अनुकूल व पोषक असे संपूर्णत: सुरक्षित वातावरण.

★ अभ्यासाबरोबरच ललित कला, क्रीडा, वाङ्‍मय इ. क्षेत्रांतील गुणांना प्रोत्साहन.

★ उत्कृष्ट वसतिगृहाची सोय.

★ ताराराणी विद्यापीठ स्कॉलरशिप फंडातून प्रत्येक वर्गात सर्वप्रथम येणाऱ्या व इतर क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थिनींना पारितोषिके.

★ एच.एस.सी. व शिवाजी विद्यापीठ परिक्षेतील उज्ज्वल यशाची परंपरा.

★ १२ वी साठी उन्हाळी सुट्टीत **इंग्रजी, अकौंटन्सी व विज्ञान** विषयांचे खास वर्ग.

★ १२वी च्या हुषार विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र 'स्कॉलर बॅच' व दर्जेदार मार्गदर्शनाची सोय.

★ बी.ए.भाग – ३ साठी **इंग्रजी, अर्थशास्त्र, गृहशास्त्र, समाजशास्त्र व हिंदी;** बी.कॉम.भाग – ३ **ॲडव्हान्स, अकौंटिंग व ऑडिटिंग व इंडस्ट्रिअल व इंडस्ट्रिअल मॅनेजमेंट** या विषयांची सोय.

★ कॉमर्स शाखेतील ज्युनिअर व सिनिअर वर्गांना इंग्रजी माध्यमातून शिकविण्याची सोय.

★ वर्षभर अभ्यासासाठी क्रमित पुस्तकांचा संच बुक बँकेतून दे...

★ गरीब व होतकरु विद्यार्थिनींना सर्व प्रकारचे सहाय्य.

★ शिवाजी विद्यापीठ निरंतर शिक्षण योजने अंतर्गत **फूड प्रिझर्वेशन, बे.. री कन्फेक्शनरी, ड्रेस डिझायनिंग व ज्युदो कराटेचे** अल्पमुदतीचे कोर्सेस चालवले जातात.

**प्राचार्य**

राजहंस / कोल्हापूर


राजहंस प्रिंटींग प्रेस, नागाळा, कोल्हापूर. फोन : २३९०